# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१९

---

### तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**सोमवार, दिनांक १७ जून, २०१९ / ज्येष्ठ २७, १९४१ ( शके )**

| | |
|---|---|
| (१) उच्च व तंत्र शिक्षण, मराठी भाषा, सांस्कृतिक कार्य, संसदीय कार्य, अल्पसंख्यांक विकास व वक्फ मंत्री<br>(२) पर्यावरण मंत्री<br>(३) पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री<br>(४) अन्न व औषध प्रशासन मंत्री<br>(५) अन्न व नागरी पुरवठा, ग्राहक संरक्षण मंत्री<br>(६) शालेय शिक्षण, क्रीडा व युवक कल्याण मंत्री | यांचे प्रभारी विभाग |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ७४**

---

### नाशिक जिल्हयातील पाणी टंचाईबाबत

**(१) * १३६१४९ श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), डॉ.राहूल आहेर (चांदवड), श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यातील बागलाण, चांदवड, मालेगाव, नांदगाव, सिन्नर, देवळा व येवला या सात तालुक्यासह अन्य तालुक्यातील २१० गावे ८५९ वाडया अशा १ हजार ६९ गावांत पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण झाली असून साडेचार लाख नागरिकांना २१८ टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात असल्याचे माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पिंपळगाव मोर (बोरीची वाडी) व बर्डेची वाडी (ता.त्र्यंबेकश्वर, जि.नाशिक) या आदिवासी भागात माहे फेब्रुवारी, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान भीषण पाणी टंचाई निर्माण झाली असून टँकरने सुरु असलेला पाणीपुरवठा अपुरा असल्यामुळे पाण्यासाठी महिलांना भटकंती करावी लागत असून मौजे शेणवड खुर्द (ता.इगतपूरी, जि.नाशिक) पाणीपुरवठा/नळयोजना सुरळीत करण्याच्या मागणीसाठी तेथील महिलांनी तहसील व पंचायत समिती कार्यालयावर दि ०७ फेब्रुवारी, २०१९ रोजी वा त्यासुमारास “हंडामोर्चा” काढला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम कृती आराखडा २०१८-१९ मधील समाविष्ट राजपूर (ता.येवला, जि.नाशिक) सह ४० गावांच्या प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेचे सविस्तर सर्वेक्षण करून या योजनेचा सविस्तर प्रकल्प अहवाल प्रशासकीय मंजुरीसाठी तातडीने शासनास सादर करावा अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधीनी दिनांक १० ऑक्टोबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास अधीक्षक अभियंता व मुख्य अभियंता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, नाशिक यांचेकडे केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, प्रश्न भाग (३) मधील योजनेला प्रशासकीय मान्यता देण्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून शासनास प्रस्ताव सादर झाला आहे काय तसेच प्रश्न भाग (२) बाबत कृत्रिम पाणी टंचाईला जबाबदार असणाऱ्यांविरोधात निवासी नायब तहसिलदार यांना निवेदन देऊन राष्ट्रीय पेयजल कार्यक्रमांतर्गत पाणी पुरवठा योजना मंजूर व्हावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मंत्री पाणी पुरवठा व स्वच्छता यांचेकडे दिनांक ३० नोव्हेंबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे आहे.

(४) व (५) राजापूर सह ४० गावे प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेच्या सर्व्हेक्षण अंदाजपत्रकास तांत्रिक मंजुरी देण्यात आली असून सर्व्हेक्षण अंदाजपत्रकास महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई यांनी दि.३०.३.२०१९ रोजी मान्यता दिली आहे. योजनेच्या सर्वेक्षणाच्या निविदा मागविण्यात येत आहेत. या योजनेचा प्रस्ताव अद्याप शासनास प्राप्त झाला नाही.

शेणवड योजनेची दुरुस्ती करण्यात आली आहे तसेच या गावाचा समावेश राष्ट्रीय ग्रामीण पेयजल योजना सन २०१९-२० च्या कृती आराखडयामध्ये करण्यात आला आहे. पिंपळगाव मोर व बर्डेची वाडी भागात कृत्रिम पाणी टंचाई निर्माण झाल्याचे दिसून आले नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## राज्यातील शाळाबाहय मुलांचे नव्याने सर्वेक्षण करण्याबाबत

**(२) * १३७७८७ प्रा.(श्रीमती) मेधा कुलकर्णी (कोथरुड), श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.सुरेश लाड (कर्जत) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शाळाबाहय मुलांसाठी पहिली मोहीम अपयशी ठरल्यामुळे शाळाबाहय मुलांकरिता दुसऱ्यांदा शोध मोहीम राबविल्याचे माहे जानेवारी, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शाळाबाहय मुलांना शिक्षकांनी शाळेत आणावे याकरिता बालरक्षक योजना सुरु करण्यात आली असून  शाळाबाहय विदयार्थ्यांची शोध मोहीम व पटनोंदणी पंधरवडा दरवर्षी शैक्षणिक सत्राच्या सुरुवातीला आयोजीत केला जातो तसेच मध्येच शाळा सोडून गेलेल्या मुलांचा शोध घेवून वयानुसार समकक्ष वर्गात दाखल करुन प्रत्येक विदयार्थ्यांवर तीन हजार रुपये खर्च केला जात असून तसेच मोफत पाठयपुस्तके व मध्यान्ह भोजन दिले जात असतांनाही शाळाबाहय विदयार्थ्यांची संख्या संपूर्ण महाराष्ट्रात माहे मे, २०१८ व माहे ऑक्टोबर, २०१८ मध्ये ५ लाखापेक्षा जास्त असल्याचे तसेच पुण्यातील शाळाबाहय मुलांच्या सर्वेक्षणानुसार पुणे शहरात २५०० तर जळगाव १४३४ शाळाबाहय विद्यार्थी आढळून आले असल्याचे  माहे मार्च, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील शाळाबाह्य मुलांच्या नव्याने होणाऱ्या शोध मोहीमच्या सर्वेक्षणातील त्रुटी दाखवून दिल्यानंतरही त्याची दखल न घेता सदोष पद्धतीने सर्वेक्षण सुरूच ठेवल्याने स्वयंसेवी संस्थांनी सदर मोहिमेतून माघार घेण्यास सुरुवात केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच, राज्यात खाण कामगार व स्थलांतरीत मुलांच्या शोधासाठी शिक्षण विभागाकडे यंत्रणेच्या असलेल्या अभावामुळे तसेच शाळाबाहय मुलांकडे दुर्लक्ष केल्यामुळे शैक्षणिक स्तरावरील हा वर्ग मोठया प्रमाणात शिक्षणाच्या प्रवाहापासून दूर असल्याचे तसेच  सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षात राज्यात ६८,२२३ इतकी मुले शाळाबाहय असल्याचे माहितीच्या अधिकारान्वये निदर्शनास आले असले तरीही ही आकडेवारी फसवी असून शाळाबाहय मुलांची संख्या ५ लाखांहून अधिक असल्याचे मत प्राथमिक शिक्षणासाठी काम करणाऱ्या सेवाभावी संस्थांनी व्यक्त केले असून  एकूण ६८,२२३  मुलांपैकी पुण्यात १०,५०२ ठाण्यात ६,४८३ तर मुंबईत ६,२७९ शाळाबाहय मुले असल्याचे माहे सप्टेंबर,२०१८ मध्ये  निदर्शनास आले आहे, हे  ही खरे आहे काय,

(५) असल्यास, शासनाच्या २०११ च्या अधिसूचनेनुसार दरवर्षी शाळाबाहय मुलांचे सर्व्हेक्षण करणे आवश्यक असताना गत तीन वर्षापासून शाळाबाहय मुलांचे सर्वेक्षणच करण्यात आले नसल्याचे तसेच मा.उच्च न्यायालयाने माहे मार्च, २०१८ पर्यंत याबाबतचा अहवाल सादर करण्याच्या सुचना दिल्या असतानाही माहे ऑगस्ट, २०१८ महिना संपला तरीही शिक्षण विभागाने कुठलाच कार्यक्रम आखलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार शाळाबाह्य मुलांकरिता नव्याने होणाऱ्या सर्वेक्षण मोहिमेतील त्रुटी दूर करून शिक्षण हक्क मोहिमेचे धोरण ठरविणे तसेच सदर शाळाबाह्य मुलांना शिक्षणाच्या मूळ प्रवाहात आणण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आशिष शेलार :** (१) हे खरे नाही.

(२) अंशतः खरे आहे.

सन २०१८-१९ मध्ये शाळास्तरावर शिक्षकांमार्फत करण्यात आलेल्या शाळाबाह्य सर्व्हेक्षणानुसार पुणे शहरात जवळपास ४७७ शाळाबाह्य विद्यार्थी आढळून आले असून सदर शाळाबाह्य विद्यार्थी विविध स्वयंसेवी संस्थांच्या सहकार्याने नजीकच्या शाळांमध्ये दाखल करून घेण्यात येत आहेत.जळगाव जिल्हयात सन २०१८-१९ मध्ये शाळाबाह्य विद्यार्थ्यांचे नव्याने सर्वेक्षण करण्यात आलेले नाही. सदर १४३४ विद्यार्थी हे समग्र शिक्षा योजनेचे वार्षिक कार्ययोजना व अंदाजपत्रक तयार करतांना गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती यांचेमार्फत प्राप्त ३० दिवस किंवा त्यापेक्षा जास्त दिवस गैरहजर असलेले विद्यार्थी आहेत. सदर विद्यार्थी शाळेच्या पटावर आहेत. परंतु ३० दिवस किंवा त्यापेक्षा जास्त दिवस गैरहजर राहिल्याने सदर विद्यार्थ्यांना शाळाबाह्य संबोधलेले आहे. अशा विद्यार्थ्यांना जून २०१९ मध्ये शिक्षणाच्या प्रवाहात आणून विशेष प्रशिक्षण देण्यात येईल.

(३) हे खरे नाही.

(४) हे खरे नाही.

(५) हे खरे नाही.

विभागाअंतर्गत सर्व पर्यवेक्षणीय यंत्रणेकडून दरवर्षी जून मध्ये शाळाबाह्य मुलांचा शोध घेऊन शाळेत दाखल करणेचे कामकाज केले जाते.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पाबळ (ता.शिरुर, जि.पुणे) गावाला पाणीपुरवठा करण्यासाठी अधिग्रहीत केलेल्या विहिरींची रक्कम मालकाला अदा करण्याबाबत

**(३) * १४०३७२ श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाबळ (ता.शिरुर, जि.पुणे) गावाला पाणीपूरवठा करण्यासाठी रेटवडी येथील श्री.शिवराम काळे व श्री.मारुती काळे यांच्या ७ विहीरी गटविकास अधिकारी यांनी माहे जानेवारी, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान अधिग्रहीत केल्या, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अधिग्रहीत केलेल्या विहिरींची रक्कम विहिर मालकांना अद्यापही न दिल्यामुळे त्यांनी विहिरीचा पाणीपूरवठा खंडीत केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अधिग्रहीत केलेल्या विहिरींचे पैसे न देण्याची कारणे काय आहेत तसेच या विहिरींचे पैसे त्वरीत देऊन पाणीपूरवठा सुरळीत करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) अंशत: खरे आहे.

श्री.शिवराम काळे, श्रीमती ताराबाई काळे, श्री.मारुती पवळे, श्री.बारकू पवळे, श्री.हनुमंत डुबे यांच्या ७ विहिरी तहसिलदार, शिरुर यांच्या आदेशान्वये पिण्याच्या पाण्याकरिता अधिग्रहित केल्या आहेत.

(२) हे खरे नाही.

अधिग्रहीत केलेल्या विहिरींसाठी दिनांक १९.११.२०१८ ते दिनांक १५.०४.२०१९ या अधिग्रहण कालावधीची रक्कम रु. ५,२२,०००/- संबंधितांना अदा करण्यात आली आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

# मुरबाड (जि.ठाणे) येथील दुष्काळग्रस्त गावांना केमिकलच्या टँकरमधून पाणीपुरवठा होत असल्याबाबत

**(४) * १३५२९३ श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुरबाड (जि.ठाणे) तालुक्यातील मुरबाड-वैतागवाडी ही तीन वर्षापूर्वी ठाणे जिल्हा परिषद पाणी पुरवठा विभागाने नव्याने सुरु केलेली पाणी पुरवठा योजना सद्य:स्थितीत बंद असल्याचे तसेच केमिकलची ने-आण करणाऱ्या टँकरने तालुक्यात पाणी पुरवठा करण्यात येत असल्याच्या तक्रारी ग्रामस्थांनी तहसिलदार आणि पाणी पुरवठा विभागाकडे केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या केमिकल टँकरमधील पाणी रासायनयुक्त असल्याने पाण्याला दुर्गंधी येत असल्याने पिण्यास अयोग्य असून पाटगांव, खोपिवली-खुटारवाडी, मेर्दी, घागुर्ली या गावांसह ठाकूरवाडी, वाघाचीवाडी, बाटलीचीवाडी, खांड्याचीवाडी, तेव्हारवाडी, वाघवाडी इत्यादी अनेक गावातील नागरीकांनी आंघोळ केल्यास अंगाला खाज येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत मुरबाड तालुक्याचे तहसिलदार यांनी चौकशीचे आदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार रासायनीक टँकरमधून पाणी पुरवठा करणाऱ्या ठेकेदाराविरुध्द कारवाई करुन नागरीकांना शुध्द पाण्याचा पुरवठा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) हे खरे नाही.

मुरबाड तालुक्यातील वैतागवाडी येथे मागील तीन वर्षामध्ये नवीन योजना मंजूर नाही. रसायने वाहतूक करणा-या टँकरने तालुक्यात पाणी पुरवठा करण्यात येत असल्याची व टँकरमधील पाण्याला दुर्गंधी येत असून नागरीकांच्या अंगाला खाज येत असल्याची बाब खरी नाही वा अशा स्वरुपाच्या तक्रारी पंचायत समिती, पाणी पुरवठा विभागाकडे प्राप्त झालेल्या नाहीत.

(२) हे खरे नाही.

तथापि, खुटारवाडी येथे टँकरने पाणी पुरवठा करण्यात येत नसून, इतर ठिकाणी पिण्यासाठी टँकरने पाणी पुरवठा करण्यात येत आहे. परंतू, सदर पाण्यास दुर्गंधी येत असल्याबाबत व अंगाला खाज येत असल्याबाबत कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही.

मुरबाड तालुक्यातील तालुका वैद्यकीय अधिकारी, उप अभियंता पाणी पुरवठा व गट विकास अधिकारी हे टँकरमध्ये पाणी भरावयाच्या ठिकाणी वेळोवेळी भेट देत असतात. त्यावेळी पाण्यास दुर्गंधी येत असल्याचे आढळून आलेले नाही. तसेच तालुका आरोग्य अधिकारी यांचे माहितीनुसार प्राथमिक आरोग्य केंद्राच्या आंतर रुग्ण आणि बाहयरुग्ण विभागामध्ये अंगाला खाज सुटत असल्याची तक्रार असलेला रुग्ण आढळून आलेला नाही.

तालुका आरोग्य अधिकारी यांचेकडून टँकरमध्ये भरण्यात आलेल्या पाण्याची नियमित ओटी टेस्ट केली जाते सदर टेस्ट मध्ये पाणी दुषित असल्याचे वा पाण्यास दुर्गंधी येत असल्याचे आढळून आलेले नाही.

टँकर पुरवठा करणा-या ठेकेदाराकडून पुरविण्यात आलेले टँकर बदलण्यात आलेले नाहीत. माहे एप्रिल मध्ये रुजू झालेले टँकर आजतागायत सुरु आहे.

(३) मुरबाड तालुक्याचे तहसिलदार यांनी चौकशीचे आदेश दिलेले नाहीत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बुलढाणा जिल्हात पाणी पुरवठा योजना मंजूर करण्याबाबत

**(५) * १३५४६५ श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.अजित पवार (बारामती), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.राहुल बोंद्रे (चिखली) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्हयातील संग्रामपूर, जळगांव जामोद व शेगांव तालुक्यातील खारपाणपट्ट्यात येणाऱ्या १४० गावांतील नागरीकांना पिण्याचे पाणी मिळण्यासाठी १४० गाव पाणीपूरवठा योजना मंजूर करण्यात आली असून यापैकी किती गावांना पाणी पुरवठा करण्यात येत आहे व उर्वरीत गावांना पाणीपुरवठा न करण्याची कारणे काय आहेत,

(२) असल्यास, खुपगाव (जि.बुलढाणा) येथील पाणीपुरवठा योजनेचा प्रस्ताव तांत्रिक मंजुरीसह शासनास सादर केला असून सदर पाणीपुरवठा योजना मंजूर करणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ६ फेब्रुवारी २०१९ रोजी वा त्यासुमारास प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांना सादर केलेले निवेदन शासनास प्राप्त झाले आहे काय,

(३) असल्यास, जिल्हयातील मौजे उंद्री (ता.चिखली) येथील १७ गावे पाणीपुरवठा योजना गेल्या कित्येक वर्षापासुन बंद असल्यामुळे या गावातील नागरीकांकडून स्वतंत्र पाणीपुरवठा योजना सुरू करण्याची मागणी होत असून सन २०१६ मध्ये पंचायत समिती चिखली यांनी आमसभेच्या ठरावामध्ये १७ गावे पाणीपुरवठा योजना बंद करून प्रत्येक गावाला स्वतंत्र पाणीपुरवठा देण्यात यावा असा ठराव सुध्दा घेण्यात येऊन प्रत्येक गावांने ग्रामसभेच्या ठरावामध्ये हीच मागणी केलेली असल्याचे माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रश्न भाग (१) ते (३) बाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) बुलडाणा जिल्हयातील संग्रामपूर तालुक्यातील ७७ गावे व जळगाव जामोद तालुक्यातील ६३ गावे अशा एकूण १४० गावांकरीता वान धरणांवरून प्रादेशिक पाणी पुरवठा योजना कार्यान्वित करण्यात आली आहे. सद्यस्थितीत संग्रामपूर तालुक्यातील ६९ गावे व जळगांव जामोद तालुक्यातील ६२ गावे असे एकूण १३१ गावांना या योजनेव्दारे ठोक स्वरुपात पाणीपुरवठा सुरु आहे. उर्वरित ९ गावांतील अस्तित्वातील पाणीपुरवठा योजना सुरु असल्यामुळे व ग्रामपंचायतीची मागणी नसल्यामुळे पाणीपुरवठा सुरु करण्यात आला नाही.

(२) होय.

सदर पाणीपुरवठा योजनेस शासन निर्णय क्रमांक राग्रापे-२०१९/प्र.क्र.५२/पापु१३, दिनांक ८ मे, २०१९ नुसार प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

(३) होय हे खरे आहे. उंद्री १७ गावे प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेतील समाविष्ट गावापैकी ७ गावांनी योजना बळकटीकरण व दुरुस्तीबाबतची मागणी ग्रामपंचायत ठरावाव्दारे केल्याने मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत मागणी केलेल्या ७ गावांकरिता उंद्री प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेच्या रु.२८७.३५ लाख किंमतीच्या पुनरुज्जीवनाच्या अंदाजपत्रकास शासनाच्या दिनांक १४ फेब्रुवारी, २०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

(४) वरीलप्रमाणे

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## तुमसर व मोहाडी (जि.भंडारा) तालुक्यात स्वस्त धान्य दुकानात गव्हाचे कमी वाटप करण्यात येत असल्याबाबत

**(६) * १४०५३१ श्री.चरण वाघमारे (तुमसर) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तुमसर व मोहाडी (जि.भंडारा) तालुक्यात माहे जुलै, २०१८ पासून स्वस्त धान्य दुकानात गव्हाचे कमी वाटप झाल्याने स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.अन्न पुरवठा मंत्री यांना दिनांक १२ ऑक्टोबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने याबाबत चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर :** (१) होय.
(२) राज्यात विकेंद्रित खरेदी योजनेअंतर्गत प्राप्त होणाऱ्या तांदळाचे वाटप जलद गतीने होण्याच्या दृष्टीने धान उत्पादक जिल्ह्यांतील तांदळाचे प्रमाण वाढविण्यात आले होते. सदर निवेदनाच्या अनुषंगाने अंत्योदय अन्न योजनेच्या व प्राधान्य कुटुंब लाभार्थ्यांच्या गव्हाच्या परिमाणात माहे जानेवारी, २०१९ पासून वाढ करण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील जलस्त्रोत्र दुषित झाल्याबाबत

**(७) * १३५०२४ श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी), श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा), श्रीमती संगीता ठोंबरे (केज), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), डॉ.राहूल आहेर**

**(चांदवड), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ३० हून अधिक जिल्हयांमधून पाण्याचे नमुने गोळा करुन करण्यात आलेल्या सहा लाख पाण्याच्या नमुना तपासणीमध्ये १ लाख ७१ हजार ४८४ जलस्त्रोत हे दूषित असल्याची माहिती केंद्रीय पेयजल आणि स्वच्छता मंत्रालयाच्या अहवालात नमूद केल्याचे दिनांक २५ एप्रिल, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लातूर जिल्ह्यात खाजगी पाणी विक्रेत्यांकडून नागरिकांना तलावातील, दगड खाणीतील व डबक्यातील दूषित पाणीपुरवठा होत असून या पाण्याला दुर्गंधी येत असल्याने नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला असून नांदेड जिल्हयात गतवर्षी सरासरीच्या तुलनेत अत्यल्प पाऊस झाल्याने भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा विभागाच्या जिल्हा पाणी गुणवत्ता तपासणी प्रयोगशाळेत माहे मार्च, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान पिण्याच्या पाण्याच्या ६५५ नमुन्यांची रासायनिक व अनुजैविक पध्दतीने तपासणी केली असता जिल्हयात ३३६ पाणी नमुने दुषित आढळून आले असून उमरी तालुक्यात १, धर्माबाद तालुक्यात ८ व नायगाव तालुक्यात १२ जलस्त्रोत दुषित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच पुणे जिल्ह्यात जिल्हा परिषदेच्या पाणी पुरवठा व स्वच्छता आणि आरोग्य विभागाकडून करण्यात आलेल्या पाहणीत जिल्ह्यात १३ तालुक्यात १७५ ठिकाणी नागरिक दुषित पाणी पीत असल्याचे माहे डिसेंबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यातील ७५ ते ८० टक्के जलस्त्रोत हे घरगुती सांडपाण्यामुळे दुषित झाले असून शहरी व मुख्यत: ग्रामीण भागातील दूषित पाण्याच्या टक्केवारीत मोठ्या प्रमाणात वाढ झाली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने राज्यातील दुष्काळी भागातील पाणी टंचाई दूर करुन शुद्ध पाणीपुरवठा करण्याच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर** : (१) सन २०१८-१९ च्या केंद्र शासनाच्या संकेतस्थळावरील अहवालानूसार, पाणी नमुने तपासण्यात आलेल्या १९१७६९ स्त्रोतांपैकी ४०६८७ स्त्रोत रासायनिक दृष्ट्या दूषित आढळून आले आहेत.
(२) लातूर जिल्हयात खाजगी पाणी विक्रेत्यांकडून नागरिकांना तलावातील, दगड खाणीतील, डबक्यातील दूषित पाणीपुरवठा होत असल्याचे व या पाण्याला दुर्गंधी येत असल्याचे आढळून आले नाही.

नांदेड जिल्हयांमध्ये मार्च २०१९ दरम्यान पिण्याच्या पाण्याचे ६५५ नमुन्यांपैकी ३३६ पाणी नमुने दुषित आढळून आले असून उमरी तालुक्यात १, धर्माबाद तालुक्यात ८ व नायगाव तालुक्यात १२ जलस्त्रोत दुषित आढळून आले आहेत.
(३) होय.
(४) सन २०१८-१९ च्या केंद्र शासनाच्या संकेतस्थळावरील अहवालानूसार, रासायनिक घटकांची टक्केवारी २४.९९% इतकी आहे. तसेच जैविक घटकांची टक्केवारी ९.९९% इतकी आहे.
(५) दुष्काळी परिस्थितीत ज्या गावांना टंचाई आहे अशा गावात जलस्त्रोत अधिग्रहणाव्दारे पाणी पुरवठा करण्यात येत आहे. तसेच सदर अधिग्रहण स्त्रोताची पाणी तपासणी प्रयोगशाळेमार्फत तपासणी होत आहे. तसेच ज्या गावांमध्ये टँकर व्दारे पाणी पुरवठा केला जातो त्या पाण्याचे शुध्दीकरण करून ग्रामस्थांना शुध्द पाणी पुरवठा करणेबाबत सूचित करण्यात आलेले आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील भेसळयुक्त दुधाच्या विक्रीवर प्रतिबंध घालण्यासाठी कायद्यात बदल करण्याबाबत

**(८) * १३५३१९ श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण),**

**श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर), श्री.सदा सरवणकर (माहिम), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरात दुध वितरण करताना मोठ्या प्रमाणात दुध भेसळ होत असून माहे एप्रिल, २०१८ पासून आजतागायत अन्न व औषध प्रशासनाने मुंबईत सात ठिकाणी दूध भेसळीची प्रकरणे निदर्शनास आणली असून त्यातून सतराशे लिटर दुधाचा साठा जप्त करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भेसळयुक्त दुधामुळे अनेक गंभीर आजारांची लागन होत असल्याने दुध भेसळ अजामीनपात्र गुन्हा ठरविण्यासंदर्भातील नियमात सुधारणा करण्याच्या प्रस्तावावरील शासनाचा विचार पूर्ण झाला आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात कोणता निर्णय घेण्यात आला आहे, त्याचे स्वरुप काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल :** (१) सन २०१८-१९ या वर्षात अन्न व औषध प्रशासनाच्या बृहन्मुंबई विभागाकडून दुध भेसळीच्या एकूण ०८ प्रकरणात धाडी टाकून २२१८.५१ लिटर दुधाचा साठा जप्त करुन नष्ट केला आहे.

(२) व (३) दुध भेसळ संदर्भातील गुन्हा दखलपात्र व अजामीनपात्र गुन्हा ठरविण्यासंदर्भातील भारतीय दंड विधान कलम २७२ व २७३ मध्ये सुधारणा विधेयक महाराष्ट्र विधानमंडळाच्या सन २०१८ च्या हिवाळी अधिवेशनात दोन्ही सभागृहात पारीत करण्यात आले असून विधेयक मा.राष्ट्रपती महोदयांच्या मान्यतेसाठी केंद्र शासनास पाठविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अन्न व औषध प्रशासनाने पुर्व विदर्भात अनेक ठिकाणी धाडी टाकून कोट्यवधी रुपयांचा निकृष्ट दर्जाचा माल जप्त केला असल्याबाबत

**(९) * १३७२१२ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर विभागातील नागपूर, भंडारा, वर्धा, चंद्रपूर व गडचिरोली या जिल्हयात अन्न व औषध प्रशासन विभागाने सन २०१८-१९ या वर्षामध्ये अनेक दुकानांवर धाड टाकून प्रतिबंधित अन्नपदार्थांची विक्री करणाऱ्यांविरुध्द कारवाई करून रूपये १९ कोटी ५७ लाख किंमीतीचा ७३४२ क्विंटल साठा जप्त केला असून यात १६ कोटी ७५ लाख रूपयांची ६.५५ लाख किलो निकृष्ट दर्जाची सुपारी जप्त करण्यात आली असल्याचे दिनांक २८, एप्रिल २०१९ रोजी वा त्यासुमारास निर्दशनास आले आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबधितावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल :** (१) हे अंशतः खरे आहे.

(२) नागपूर विभागातील नागपूर, भंडारा, वर्धा, चंद्रपुर व गडचिरोली या जिल्हयात अन्न व औषध प्रशासनाने सन २०१८-२०१९ या कालावधीत प्रतिबंधित अन्न पदार्थ विक्रीच्या संदर्भात १११ जप्ती कारवाया केल्या असून १०३५५.२२ कि.ग्रॅ. एवढा रु.१,२९,८५,५७९/- किंमतीचा साठा जप्त करण्यात आला आहे.

तसेच नागपूर विभागामध्ये सन २०१८-२०१९ या कालावधीत कमी दर्जाच्या व असुरक्षित असल्याच्या संशयावरुन सुपारीच्या अनुषंगाने २५ जप्ती कारवाया करुन १४१९०४६.५ कि.ग्रॅ. वजनाचा व रु.१८,८३,७८,६८२/- किंमतीचा साठा जप्त केला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यासह कोकणात शिक्षक भरती करण्यात येणार असल्याबाबत

**(१) * १३६००६ श्री.राजन साळवी (राजापूर), श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण), श्री.सुनिल शिंदे (वरळी), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.संदीपानराव भुमरे (पैठण), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.राहूल आहेर (चांदवड), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.विजय काळे (शिवाजीनगर), श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.दिलीप सोपल (बार्शी), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.संजय कदम (दापोली), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमित झनक (रिसोड), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.राहुल बोंद्रे (चिखली) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात पवित्र पोर्टल" द्वारे स्थानिक स्वराज्य संस्था आणि खासगी शिक्षण संस्थांमध्ये १० हजार शिक्षक भरती करण्यात येणार असल्याचे माहे मार्च, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, राज्यामध्ये अतिरिक्त व समायोजन न झालेल्या शिक्षकांची संख्या मोठया प्रमाणात असूनही शासनाकडून थेट शिक्षक भरती केली जात आहे व यापूर्वीही करण्यात आली आहे तसेच अनेक जिल्हयात एसइबीसी तसेच खुल्या जागांची संख्या शुन्य दाखविली असून याबाबत माहिती घेतली असता पुणे जिल्हयात अनेक जागा रिक्त आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सोलापूर कोकण जिल्हयासह राज्यातील विविध शाळांमध्ये हजारो शिक्षकांची पदे रिक्त आहेत तर सदरहू भरतीमध्ये कोकण विभागात सर्वात जास्त जागा भरण्यात येणार असून यात स्थानिकांना प्राधान्य देण्यात यावे अशी मागणी कोकण डी एड., बी एड धारक असोसिएशने केली असून दिनांक ८ मार्च, २०१९ रोजी वा त्यासुमारास रत्नागिरी जिल्हा परिषद ते जिल्हाधिकारी कार्यालय असा मोर्चा काढण्यात आला होता, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यातील अतिरिक्त व समायोजन न झालेल्या शिक्षकांऐवजी थेट शिक्षक भरती केल्याने शासनाचे आर्थिक नुकसान होत असून यामध्ये मोठया प्रमाणावर गैरव्यवहार होत असल्याने याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी मा.मुख्यमंत्री व शालेय शिक्षण मंत्री यांचेकडे माहे मे, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान लेखी निवेदनाद्वारे तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) तसेच, राज्यात पट पडताळणी मोहिमेत अतिरिक्त ठरलेल्या शिक्षकांचे समायोजन होईपर्यंत खासगी अनुदानित शाळांनी नवीन शिक्षकांची भरती न करण्याबाबचे आदेश काढलेले असतानाही उक्त शाळांनी केलेल्या ४०११ शिक्षकांच्या नेमणुकांना बेकायदेशीररित्या मान्यता दिल्याबाबत केलेल्या चौकशीअंती या शिक्षकांच्या नेमणूका रद्द करण्याचे आदेश शासनाने माहे, ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान दिले असून बेकायदेशीर मान्यता देणाऱ्या ४६ शिक्षणाधिकाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई करण्याचा प्रस्ताव शिक्षण आयुक्तांनी माहे मार्च, २०१९ मध्ये वा त्या दरम्यान शासनास सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, या संपूर्ण प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आशिष शेलार :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) होय, हे खरे आहे.

(४) अशा प्रकारचे निवेदन आढळून आले नाही.

(५) होय, हे खरे आहे.

(६) कार्यवाही सुरु आहे.

-----------------

## पुणे जिल्हयातील नळपाणी पुरवठा योजनांची कामे प्रलंबित असल्याबाबत

**(११) * १३७९७३ श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.बसवराज पाटील (औसा), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हयात राष्ट्रीय पेयजल कार्यक्रम आणि मुख्यमंत्री योजनेतंर्गत मंजूर करण्यात आलेल्या साडेपाचशे कोटी रुपयांच्या नळपाणी पुरवठा योजनांची कामे प्रशासनाच्या दिरंगाईमुळे प्रलंबित असल्याचा आरोप सर्वपक्षीय जिल्हा परिषद सदस्यांनी महासभेत केला असल्याचे दिनांक २८ मार्च, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, टंचाई आराखडयातील पाणी पुरवठा योजनांच्या कामांना जिल्हाधिका-यांनी तातडीने परवानगी दयावी अशी मागणी यावेळी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दुष्काळामुळे सध्याची पाणीटंचाई लक्षात घेता उपरोक्त मागणीवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) अंशत: खरे आहे.

राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत सन २०१८-१९ च्या वार्षिक कृती आराखडयामधील ४८८ योजनांपैकी १७० योजनांना प्रशासकीय मान्यता देण्यात येऊन, ५९ योजनांना कार्यारंभ आदेश देण्यात आले असून, उर्वरीत १११ योजना निविदा प्रक्रियेमध्ये आहेत. तसेच, २२४ योजनांचे आराखडे तयार करण्यात आले आहेत.

मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत रुपये १३.१० कोटी खर्चाच्या १२ योजनांना मंजूरी देण्यात आली असून, त्यापैकी २ योजनांची कामे पूर्ण झाली आहेत. ७ योजनांची कामे प्रगतीत आहेत. ३ योजनांची कामे ऑक्टोबर, २०१९ अखेर कार्यान्वित करण्याचे नियोजन आहे.

(२) व (३) होय.

पुणे जिल्हयासाठी सन २०१८-१९ च्या टंचाई आराखडयामध्ये ४०९६ उपाययोजनांचा समावेश करण्यात आला आहे. त्यानुसार रुपये ९५.८१ कोटी इतक्या खर्चाची नळ पाणी पुरवठा योजनेशी संबंधित उपाययोजनेतील कामे प्राधान्याने हाती घेवून पुर्ण करण्यात येत आहेत.

तसेच, रुपये ६.८७ कोटी किंमतीचा पुरवणी आराखडा जिल्हाधिकारी, पुणे यांना मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे. याबाबत पुढील कार्यवाही प्रगतीत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सहार (मुंबई) येथील जे.डब्ल्यू मॅरिएट हॉटेलमध्ये निकृष्ट अन्नामुळे ६ डॉक्टरांना झालेली विषबाधा

**(१२) * १३८४६६ श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.सुनिल केदार (सावनेर) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सहार (मुंबई) येथील जे.डब्ल्यू. मॅरिएट हॉटेलमध्ये दिनांक २० एप्रिल, २०१९ रोजी निकृष्ट अन्नामुळे ६ डॉक्टरांना विषबाधा झाल्याचे दिनांक ३ मे, २०१९ रोजी वा त्यासुमारास सोल्युशन्स ग्रुप ऑफ इंडिया यांनी हॉटेलला दिलेल्या नोटीसच्या अनुषंगाने निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने सदर गंभीर प्रकरणाची चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार अन्नाच्या नमुन्यांची तपासणी करणे तसेच उक्त हॉटेल व्यवस्थापनावर कारवाई होण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच त्याचा तपशिल काय आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल :** (१) व (२) दि. ०३ मे, २०१९ रोजी वृत्तापत्रात प्रसिध्द झालेल्या बातमीमुळे सदरची बाब अन्न व औषध प्रशासनाच्या निदर्शनास आली आहे. त्यानुषंगाने सदर प्रकरणी अन्न व औषध प्रशासनाने जे.डब्लु. मॅरिएट, सहारा, अंधेरी-पूर्व या आस्थापनेची तपासणी करुन तपासणीवेळी अन्न पदार्थ बनविण्यासाठी उपलब्ध असलेल्या मलई पनीर, रिफांइड सनफ्वॉवर ऑइल व तयार अन्न पदार्थ चिकन कोल्हापूरीचे नमुने काढण्यात आले आहेत. नमुन्याचे अहवाल अद्याप प्रलंबित आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कोल्हापूर जिल्हयातील पाणी टंचाई दूर करण्याबाबत

**(१३) * १३४९११ श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी), श्री.उल्हास पाटील (शिरोळ), श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हयातील नागरीक भोगावती आणि पंचगंगा नदीच्या पाण्यावर अवलंबून असून सदर नद्यांमध्ये पाणी नसल्याने माहे मे, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान ४६ हजार हेक्टर क्षेत्रामध्ये पाणी टंचाई निर्माण झाली असून शाहूवाडी तालुका व शिरोळ तालुक्यातील तमदलगे, कोडीग्रे, जैनापूर, निमशिरगाव, संभाजीपूर या गावात पाणी टंचाई निर्माण झाली असल्याचे माहे मे, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिरोळ तालुक्यातील तमदलगे, कोडीग्रे, जैनापूर, निमशिरगाव, संभाजीपूर या गावांच्या पाणीपुरवठा योजनेसाठी निधी मिळण्याचा प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयाकडे सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, शाहुवाडी पंचायत समितीत महिनाभरापासून पाईप लाईन दुरुस्ती न केल्यामुळे पाणी टंचाई निर्माण झाली असल्याने कर्मचाऱ्यांना पाणी असूनही वापरता येत नसल्याने समितीतील शौचालये बंद करण्याची वेळ आली आहे तसेच आंबार्डी नदीचे पात्र कोरडे पडल्याने पाणी टंचाई निर्माण झाली असून परखंदळे गावात नैसर्गिक स्त्रोतातून सायफन पद्धतीने होणारा पाणी पुरवठा बंद झाल्याने तीव्र पाणी टंचाई निर्माण होऊन सदर गावातील लोकांना खाजगी टँकर द्वारे पाणी विकत घ्यावे लागत असल्याने ग्रामस्थांना आर्थिक नुकसान सोसावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, कोल्हापूर जिल्हयातील २९७ ठिकाणी पाणी टंचाईचा आराखडा तयार करुन उक्त आराखडयात १०९ गावे आणि १८८ वाडयांचा समावेश केला असणे तसेच पाणी टंचाई आराखडयातील १४ विंधन विहिरीचे प्रस्ताव माहे मे, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान जिल्हा परिषदेकडे पाठविण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, कोल्हापूर जिल्हयात नागरीकांना पाणी उपलब्ध होण्याच्यादृष्टीने पाणी टंचाई निवारण योजनांचे प्रस्ताव मंजूर होऊन त्याची सक्षमपणे अंमलबजावणी होण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलबांची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) हे खरे नाही.

(२) ग्राम स्तरावरुन पिण्याच्या पाण्याची सोय करण्यात आल्यामुळे वेगळया निधी मागणीचा प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयास सादर करणेचा प्रश्न उद्भवलेला नाही.

(३) सद्य:स्थितीत पाईपलाईन दुरुस्ती करुन शाहूवाडी पंचायत समिती इमारतीमध्ये पाणी पुरवठा सुरळीत सुरु करण्यात आलेला आहे.

सद्य:स्थितीत आंबार्डी नदीचे पात्र कोरडे पडले असले तरी, परखंदळे, ता. शाहुवाडी हे गाव पिण्याच्या पाण्यासाठी आंबार्डी नदीवर अवलंबून नाही.

सायफन पध्दतीने होणारा झ-याचा पाणी पुरवठा बंद झाला आहे. मात्र हातपंप व विंधनविहिरीद्वारे ग्रामस्थांना पाण्याची उपलब्धता आहे. या गावात खाजगी टँकरद्वारे पाणी विकत घेत आहेत याबाबतची नोंद जिल्हा परिषद, कोल्हापूर कडे नाही.

(४) व (५) जिल्हयातील माहे मे, २०१९ अखेर एकूण ५३ विंधण विहिरी, ६ नळ योजनांची विशेष दुरुस्ती व १ तात्पुरती पाणी पुरवठा योजना अशा ६० उपाययोजनांना मंजूरी देण्यात आली असून त्यापैकी ५३ कामे पूर्ण झाली असून अन्य कामे प्रगतीपथावर आहेत.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## अंबरनाथ (जि.ठाणे) येथील शिधावाटप कार्यालयासाठी नवीन जागा व निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(१४) * १३८२०१ डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबरनाथ (जि.ठाणे) शहराची लोकसंख्या ३.२५ लाखांपेक्षा अधिक असून शहरात १२०८.६७ चौ.फुटाचे एकच शिधावाटप कार्यालय असल्याने नस्त्या, कागदपत्रे व इतर साहित्य ठेवण्यास अडचण निर्माण होत आहेत, हे खरे आहे काय,

(२) तसेच नागरिकांसाठी फक्त दोनच खिडक्या असल्याने रस्त्यावर नागरिकांच्या रांगा लागत असून सदर रस्त्यावरुन भरधाव जाणाऱ्या वाहनांमुळे अनेक अपघात होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शिधावाटप कार्यालयासाठी शासकीय जागा उपलब्ध करुन निधीची तरतूद करण्यात यावी अशी मागणी निवेदनाच्या माध्यमातून स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.अन्न व नागरी पुरवठा मंत्री यांचेकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली व याबाबतची सद्यःस्थिती काय आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे आहे.
(४) स्थानिक लोकप्रतिनिधींनी सूचविलेली कैलाश प्लाझा ही पर्यायी जागा म्हणून घेण्याची व त्याचबरोबर पर्यायी जागेच्या क्षेत्रफळाशी सुसंगत वाजवी भाडे दर प्रमाणपत्र सार्वजनिक बांधकाम विभागाकडून प्राप्त होण्याकरीता परिमंडळ स्तरावर कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## आडूळ बुद्रुक (ता.पैठण, जि.औरंगाबाद) येथील मुख्यमंत्री राष्ट्रीय पेयजल योजनेचे काम प्रलंबित असल्याबाबत

**(१५) * १३६३९९ श्री.संदीपानराव भुमरे (पैठण), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आडूळ बुद्रुक (ता.पैठण, जि.औरंगाबाद) येथे पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई निर्माण झाली असून प्रत्येक कुटुंबाला वर्षाला पाण्यासाठी ३० हजार रुपये खर्च करावे लागत असल्याचे माहे एप्रिल, २०१९ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आडूळ बुद्रुक व परिसरातील गावासाठी सन २०१८ मध्ये दोन कोटी नऊ लाख रुपयांच्या मुख्यमंत्री राष्ट्रीय पेयजल योजनेच्या कामाला मंजूरी देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर योजनेचे काम प्रलंबित आहे हे खरे आहे काय,

(४) असल्यास, योजनेची सद्यःस्थिती काय आहे तसेच उक्त गावांना पाणी पुरवठा करण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) अंशत: खरे आहे.

पैठण तालुक्यामध्ये यावर्षी ३१६.१० मी.मी. इतका पाऊस झाला असून हे प्रमाण सरासरीच्या ४८.२७ टक्के आहे. त्यामुळे आडूळ बुद्रुक या गावास पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण झालेली आहे.

(२) होय.

मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत मौ.आडुळ बु., आडूळ तांडा व खडकी तांडा या गावांसाठी रु.२२२.१८ लक्ष इतक्या ढोबळ किंमतीच्या अंदाजपत्रकास मंजूरी देण्यात आली आहे.

(३) होय.

सदर योजनेची उद्भव विहिर पारुंडी तांडा सिंचन तलावाच्या बुडीत क्षेत्रात प्रस्तावित आहे. या विहिरीच्या कामास सुरुवात केली असता पारुंडी तांडा येथील ग्रामस्थांनी तीव्र विरोध केला आहे. याबाबत पोलीस स्टेशन पाचोड, येथे तक्रार दाखल करण्यात आली आहे. तरीही ग्रामस्थ विहिरीच्या कामात अडथळा आणत असल्याने देवगांव सिंचन तलावात पर्यायी उद्भव विहिरी घेण्याचे निश्चित केले. त्यानुसार देवगांव सिंचन तलावात उद्भव विहिरीचे काम सुरु केले असता देवगाव येथीलही ग्रामस्थांनी विरोध केला आहे. त्यामुळे सद्यस्थितीत योजनेचे काम बंद आहे.

(४) सदर गावांना दिनांक २६.०९.२०१८ पासून २ टँकरव्दारे व फेब्रुवारी, २०१९ पासून ३ टँकरव्दारे पाणीपुरवठा करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## भरडखोल (ता.श्रीवर्धन, जि.रायगड) गावातील पाणी टंचाईबाबत

**(१६) * १३४९४२ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भरडखोल (ता.श्रीवर्धन, जि.रायगड) ग्रामपंचायत हद्दीतील ग्रामस्थांना पाणी पुरवठा करणा-या महाराष्ट्र जिवन प्राधिकरणाच्या १७ ते १८ वर्षापूर्वीच्या पाईप लाईनची दुरवस्था झाली असल्याचे माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पाईप लाईन जिर्ण होऊन वारंवार फुटण्याच्या प्रकारांमुळे ग्रामस्थांची पिण्याच्या पाण्याची अत्यंत गैरसोय होत असून साडे तीन हजार गावच्या लोकसंख्येच्या तुलनेत नळ पाणी कनेक्शनही कमी प्रमाणात असल्यामुळे नागरिकांना विशेषत: महिलांना पिण्याच्या पाण्यासाठी वणवण करावी लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, भरडखोल येथील पाणी टंचाई दुर करण्यासाठी या गावाचा समावेश राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम कृती आराखडा सन २०१९-२० मध्ये करण्यात आला असून या गावांच्या योजनेच्या कामाकरीता अंदाजे रु.२००.०० लक्ष इतकी रक्कम प्रस्तावित करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) हे खरे आहे.

(२) (३) हे खरे आहे.

भरडखोल गावामध्ये सन १९९७-९८ मध्ये महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, माणगाव यांच्यामार्फत नळ पाणी पुरवठा योजना कार्यान्वित

करण्यात आलेली आहे. तथापि, सदर योजनेतील पंपींग मशिनरी, उर्ध्ववाहिनी, उद्भव विहीर इत्यादी उपांगे नादुरुस्त झाल्याने व गावाचे विस्तारीकरण झाल्यामुळे त्याचा पाणी पुरवठ्यावर परिणाम होऊन पाणी टंचाई निर्माण झालेली आहे. सद्य:स्थितीत भरडखोल गावाचा समावेश राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम कृती आराखडा सन २०१९-२० मध्ये करण्यात आला आहे.

(४) राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम कृती आराखड्यास मंजूरी प्राप्त झाल्यानंतर योजनेचे काम हाती घेण्यात येईल.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## औंढा नागनाथ (जि.हिंगोली) तालुक्यातील २३ गावातील बंद प्रादेशिक नळ पाणीपुरवठा योजना सुरु करण्याबाबत

**(१७) * १३७०२७ डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्हयातील पाणीपुरवठा प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजनेची दुरुस्तीची कामे मागील कांही वर्षापासून प्रलंबित असल्यामुळे सद्य:स्थितीत केवळ सहा गावांनाच पाणी पुरवठा होत असुन या योजनेवर अवलंबून असलेल्या एकोणीस गावांमध्ये मोठया प्रमाणात पाणी टंचाई निर्माण झाली असल्याचे माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राष्ट्रीय पेयजल योजनेत ८७ गावांचा पाणीपूरवठा योजनांचा आराखडा मंजूर झाला असून त्यापैकी १३ गावांचे प्रस्ताव जिल्हा परिषदेने शासनाकडे पाठविले असून औंढा नागनाथ तालुक्यातील शिरड शहापूर व परिसरातील पाण्याची पातळी खालावली असल्याने तीव्र पाणीटंचाई निर्माण झाली असून मागील ३ वर्षापासून येथील २३ गाव प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजना देखील बंद असल्याचे दिनांक २५ मार्च, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या कामाची व्याप्ती जास्त असल्याने खाजगी यंत्रणेमार्फत सर्व्हे करुन या योजनेचे सुधारीत प्रस्ताव तयार करण्यास मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, हिंगोली यांनी कळविल्यानुसार संबंधित अधिकाऱ्यांनी जिल्हा परिषद हिंगोली यांनी सुधारित प्रस्ताव तयार करुन शासनाकडे पाठविला आहे काय, तसेच सदर नळ पाणी पुरवठा योजना सुरु करण्याची मागणी सरपंच व ग्रामस्थांनी केली आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) हिंगोली जिल्हयातील मौ.मोरवाडी (ता.कळमनुरी) २५ गावे प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजनेतून ६ गावाना पाणी पुरवठा सुरु असून उर्वरित गावांकरिता मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत पुनरूज्जीवन करीताचे अंदाजपत्रक तयार करण्यात येत आहे.

हिंगोली जिल्हयातील ८७ गावांचा आराखडा राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांच्या वार्षिक कृती आराखडयात समावेश केल्या असून त्यापैकी १३ गावांचे प्रस्ताव तयार करण्यात आलेले असून मुख्य अभियंता म.जि.प्रा., प्रादेशिक विभाग यांनी त्यापैकी १० योजनांना शेरे पुर्ततेच्या अधिन राहून मान्यता देण्यात आलेली आहे.

मौ. शिरड शहापूर ता. औंढा ना. या गावांचा समावेश २० गावे पुरजळ प्रादेशीक पाणी पुरवठा योजनेत आहे. सदर योजना MRDWP अंतर्गत दिनांक २४/५/२०१९ च्या शासन निर्णयान्वये पुनरूज्जीवीत करण्यात आलेली आहे. तसेच मौ. सिध्देश्वर २३ गावे (ता.औंढा, हिंगोली, खेतगाव) या प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेच्या / पुनरूज्जीवनास दिनांक ६/६/२०१९ च्या शासन निर्णयान्वये मंजुरी देण्यात आलेली आहे.

राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमा अंतर्गत सन २०१८-१९ मध्ये कामाची व्याप्ती जास्त असल्याने खाजगी यंत्रणे मार्फत सर्व्हेक्षण करून घेतले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## खेड (जि.रत्नागिरी) तालुक्यातील धनगरवाड्यांमधील पाणी टंचाईबाबत

**(१८) * १३५५८४ श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खेड (जि.रत्नागिरी) तालुक्यातील ३३ गावांमधील ७५ धनगरवाडया पिण्याच्या पाण्याच्या सुविधेपासून वंचित असून येथील नागरीकांना पाण्यासाठी दूर जावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या धनगरवाड्यांचा पाणीप्रश्न सोडविण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) अंशत: खरे आहे.

अस्तिवातील उद्रभवामधील पाणी कमी झाल्यामुळे टंचाई जाणवते.

(२) धनगरवाडयांचा पाणी प्रश्न सोडविणेसाठी टंचाई अंतर्गत विविध उपाययोजना घेण्यात आल्या असून तसेच राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम, जलयुक्त शिवार योजनेत या वाडया समाविष्ठ करुन याद्वारे येथील पाणीप्रश्न सोडविण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शिखर शिंगणापूर (ता.माण, जि.सातारा) या परिसरात निर्माण झालेली तीव्र पाणीटंचाई

**(१९) * १४०२३९ श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिखर शिंगणापूर (ता.माण, जि.सातारा) या परिसरातील विहिरींनी तळ गाठला असुन ऐतिहासिक ३५ एकर क्षमतेचा आणि २५ फुट खोली असलेला पुष्करतीर्थ तलावात मृतसाठा असुन येथील ग्रामस्थांना पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे व त्यांना पाणी विकत घ्यावे लागते तर शिखरवस्तीवरील ग्रामस्थांना ५०० लिटर पाण्यासाठी २५० ते ३०० रुपये मोजावे लागत असल्याचे माहे मे, २०१९ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिंगणापूर ग्रामपंचायतीची पाणीपुरवठा विंधनविहिर कोरडी पडली तरी पुष्कर तलावामध्ये दहा ते वीस टक्के तरी किमान पाणी असल्याने परिसरातील दोन-चार बोअरवेल, हातपंप वा इतर जलस्त्रोत सहा महिने जिवंत राहून शिंगणापूरची तहान भागते मात्र या वर्षी शिंगणापूर परिसरातील मुख्य जलस्त्रोत पुष्कर तलावातच पाणी नसल्याने परिसरात कोठेही पाणीसाठा उपलब्ध नाही, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच माण तालुक्यातील शिंगणापूरसह १० गावासाठी वरदान ठरलेली शिंगणापूर प्रादेशिक पाणी पुरवठा योजना थकीत वीजबिलामुळे मागील काही वर्षापासून बंद अवस्थेत असल्याचे माहे फेब्रुवारी, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार बंद असलेली शिंगणापूर पाणी पुरवठा योजना सुरु करणे तसेच माण तालुक्याला पाणी पुरवठा करण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे काय,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) व (२) हे खरे नाही.

सन २०१८ मध्ये अत्यल्प पर्जन्यमानामुळे पुष्कर तलाव पूर्ण क्षमतेने भरला नाही. तसेच फेब्रुवारी, २०१९ मध्ये पुष्कर तलाव पूर्णपणे आटल्याने शिखर शिंगणापूर, ता. माण येथे पाणी टंचाई निर्माण झाली.

शिखर शिंगणापूर ग्रामपंचायतीच्या मागणीनुसार दिनांक ०८.०३.२०१९ पासून टँकरव्दारे पाणी पुरवठा करण्यात येत आहे. तसेच अस्तित्वातील एकूण २१ विंधन विहिरींपैकी पाणी उपलब्ध असलेल्या ५ विंधन विहिरींव्दारे पाणी उपलब्ध करुन दिले जात आहे.

त्यामुळे शिखर शिंगणापूर येथील ग्रामस्थांना पाण्यासाठी पैसे मोजावे लागतात ही बाब खरी नाही.

(३) हे खरे आहे.

(४) शिखर शिंगणापूर पाणी पुरवठा योजनेची मोठया प्रमाणावर दुरुस्ती करणे आवश्यक आहे. सदर योजनेचे पुनरुज्जीवन करण्या संदर्भात सर्वेक्षण करुन अहवाल सादर करण्याबाबत जिल्हा परिषद, सातारा यांनी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, कराड यांना कळविले आहे.

तथापि शिंगणापूर प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेच्या क्षेत्रात तसेच माण तालुक्यातील टंचाईग्रस्त गावांत पिण्याच्या पाण्याच्या टंचाई अंतर्गत उपाययोजना घेण्यात आल्या आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अमरावती जिल्ह्यातील टंचाईग्रस्त गावांमध्ये पाणीपुरवठा करण्याबाबत

**(२०) * १३९५५१ प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.राहुल बोंद्रे (चिखली) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्ह्यात पाणी टंचाई निर्माण झाली असताना जिल्ह्यातील पाणी टंचाई असलेल्या गावांसाठी कोणतीही उपाययोजना केली नसल्याचे दिनांक ७ मे, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यात अमरावती तालुक्यातील ग्रामडोल, मासोद, पिंपळविहिर, पडसोडा, वडगाव माहुरे, नांदगाव खांडेश्वर तालुक्यातील फुबगाव, काजणा, निमसवाडा, चांदूर रेल्वे तालुक्यातील सातेफळ व धामनगाव रेल्वे तालुक्यातील जळगाव मंगरुळ तसेच मेळघाट भागातील गावांचा समावेश असून स्थानिक प्रशासनाने पाणीटंचाईवर कोणत्याही उपाययोजना केल्या नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच भातकुली तालुक्यातील धामोरी, आष्टी, मार्की या गांवाना नियमित पाणी पुरवठा होत नसल्याने १०५ गावे प्रादेशिक पाणी पुरवठा योजने अंतर्गत शेवटच्या झोन मधील गावांना सुरळीत पाणी पुरवठा होण्याकरीता चांदुर बाजार मार्ग नया अकोला ते आष्टी पर्यंत स्वतंत्र पाईपलाईन टाकण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २४ नोव्हेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास जिल्हाधिकारी, अमरावती यांना निवेदन सादर केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार सदर टंचाईग्रस्त गावांमधील पाणीटंचाई निवारणार्थ तसेच सदर गावास पाणी पुरवठ्यासंदर्भात उपाययोजना न केलेल्या स्थानिक अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) या आशयाचे निवेदन अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, अमरावती यांच्याकडे प्राप्त झाले आहे.

(४) ग्रामडोल, मासोद, पिंपळविहिर, पडसोडा, वडगाव माहुरे, तालुका-अमरावती; फुबगाव, काजणा, निमसवाडा, तालुका-नांदगाव खांडेश्वर; सातेफळ, तालुका-चांदूर रेल्वे व जळगाव मंगरुळ, तालुका-धामनगाव रेल्वे तसेच मेळघाट भागातील गावांमध्ये आवश्यकतेनुसार व मागणीनुसार पाणी टंचाई अंतर्गत उपाययोजना घेतल्या आहेत.

१०५ गांवे प्रादेशिक ग्रामीण पाणी पुरवठा योजनेतील (जिल्हा-अमरावती) सायत, भातुकली, धामोरी व आष्टी या प्रभागांना चांदूर बाजार येथील मुख्य गुरुत्ववाहीनीवरुन पाणी पुरवठा करण्यासाठी नया आकोला मार्गे वायगाव अशी गुरुत्ववाहीनी टाकण्यासाठीचा प्रस्ताव तांत्रिकदृष्टया अयोग्य असल्याचे पडताळणीत दिसून आले आहे.

सदर योजनेतील वंडली, उमरापूर (चिचखेडा), आष्टी, धामोरी, चेचरवाडी (कुमागड), म्हैसपूर या ६ गावांत नळ योजनेच्या विशेष दुरुस्तीची कामे घेतली असून ५ कामे पूर्ण झाली असून उर्वरित १ काम प्रगतीपथावर आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात विशेषत: मराठवाड्यातील पाणी टंचाई दूर करण्याबाबत

**(२१) * १३५००३ श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्री.संजय कदम (दापोली), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.दिलीप सोपल (बार्शी), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.प्रदीप नाईक (किनवट), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.संग्राम थोपटे (भोर), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.बसवराज पाटील (औसा), अ‍ॅड.यशोमती ठाकूर (तिवसा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.नारायण पाटील (करमाळा), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा), श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.मनोहर भोईर (उरण),**

**डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.संजय केळकर (ठाणे), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.सुभाष साबणे (देगलूर), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), डॉ.राहूल आहेर (चांदवड), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम), श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सुमारे २८,५२३ गावांमध्ये भीषण दुष्काळ असून २४ जिल्ह्यातील ५०० गावातील जलस्त्रोत कोरडे पडून सात हजार गाव-पाडयांमध्ये विशेषत: मराठवाड्यातील आठ जिल्ह्यांपैकी औरंगाबाद विभागामध्ये ३.७२ टक्के व राज्यात २० टक्के जलसाठा पाणी शिल्लक आहे, बीड जिल्ह्यात शासकीय रुग्णालये व आरोग्य केंद्रांमध्ये पाण्याअभावी रुग्णांवर होणाऱ्या शस्त्रक्रिया बंद करण्याची परिस्थिती उद्भवली आहे तसेच केवळ लातूर जिल्ह्यात ४२९ गावे व ११२ वाड्या अशा एकूण ५४१ गाव/वाड्यांमध्ये पाणी टंचाई निर्माण झाली असल्याचे माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने सुरु केलेली जलयुक्त शिवार योजना अपयशी ठरल्याने ३२ लाख १९ हजार नागारिकांना ३९७० टँकर्सनी पाणीपुरवठा केला जात असून यासाठी रुपये १३० कोटी इतका खर्च करण्यात आला असल्याची माहिती शासनाने माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, किती जिल्ह्यातील व तालुका निहाय गावांनी टँकरने पाणी पुरवठा करावा अशी मागणी शासनाकडे केली आहे, त्यापैकी किती गावांना टँकरव्दारे पाणी पुरवठा करण्यात येत आहे तसेच राज्यातील सर्व

जलाशयांतील पाणी साठा कमी होत असल्याने सर्व पाण्याचे स्त्रोत आटण्याआधीच योग्यरित्यापाण्याचे नियोजन करण्यात यावे असे राज्याचे मुख्य सचिव यांनी राज्यातील विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी व मुख्याधिकारी यांना दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यातील ग्रामीण व शहरी भागातील वाढलेल्या तापमानामुळे नागरीकांना व जनावरांना पाणी टंचाई भासत असून काही ग्रामीण व शहरी भागात दिनांक १० जून, २०१९ पर्यंतच पाणीसाठा पुरणार असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, लातूर जिल्ह्यातील रेणापूर व औसा तालुक्यातील तीव्र पाणीटंचाई निर्माण झालेल्या गुंफावाडी, चीखुर्डा, हारवाडी, कामखेडा, रामेगाव, चिंचोली ब, साखरा आदी सह अनेक गावातील ग्रामपंचायतीने संबधित गट विकास अधिकारी पंचायत समिती यांच्याकडे विंधन विहीर अधिग्रहण, टँकर मंजुरीबाबत उपाययोजना करण्याबाबत रीतसर प्रस्ताव सादर केला असतानाही सदर प्रस्तावाच्या मंजुरीस विलंब होत आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, प्रश्न भाग (५) बाबत दोषी अधिकारी व कर्मचारी यांच्याविरुद्ध नियमानुसार उचित कारवाई करण्याबाबत व पाणी टंचाई निवारणाच्या सर्व उपाययोजना तातडीने राबविण्याबाबत लातूर ग्रामीण स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी जिल्हाधिकारी लातूर यांच्याकडे दिनांक १५ मार्च, २०१९ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(७) असल्यास, उपरोक्त राज्यातील दुष्काळी स्थिती पाहता पुढील काळात दुष्काळ व पाणी टंचाई दूर होऊन कायमस्वरुपी पाण्याचे नियोजन करण्याच्यादृष्टीने मुख्य सचिवांनी दिलेल्या निर्देशाच्या अनुषंगाने उपाययोजनेची वा त्यानुषंगाने आराखडा तयार करण्याची सद्यःस्थिती काय आहे,

(८) असल्यास, राज्यातील पाण्याचे योग्य नियोजन करुन पाणी टंचाई दूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(९) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) मराठवाडयासह राज्यात कमी पर्जन्यमान झाल्यामुळे पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण झाली आहे, हे खरे आहे.

बीड जिल्हयात मार्च, २०१९ पासुन पाणी टंचाई निर्माण झाली असली तरी प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये आवश्यक त्याठिकाणी खाजगी टँकरद्वारे पाणी पुरवठा केलेला आहे. आरोग्य केंद्रामध्ये पाण्याअभावी रुग्णावर होणा-या शस्त्रक्रिया बंद करण्याची परिस्थिती उद्भवली नाही.

लातूर जिल्हयात टंचाईकृती आराखडयानुसार मे, २०१९ अखेरपर्यंत पिण्याच्या पाण्याच्या टंचाई अंतर्गत एकूण ७७५ गावे व १७२ वाडयांमध्ये १३०२ इतक्या उपाययोजना पूर्ण करण्यात आलेल्या आहेत.

(२) राज्यातील कमी पर्जन्यामुळे पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण झाली आहे.

राज्यात दिनांक १० जून, २०१९ च्या टँकर अहवालानुसार ५२४३ गावे व ११२९३ वाडयांना ६५९७ टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्यात येत आहे.

(३) ग्रामपंचायतीनी टँकरची मागणी केल्यानंतर तहसिलदार, गट विकास अधिकारी यांचेकडून नियमानुसार तपासणी करुन त्वरित टँकर मंजूर करण्यात येतात.

दिनांक १० जून, २०१९ च्या टँकर अहवालानुसार एकूण २९ जिल्हयातील एकूण २३० तालुक्यातील ५२४३ गावे व ११२९३ वाडयांना ६५९७ टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्यात येत आहे.

नागरिकांना व जनावरांना पाणी पुरविण्याकरिता उपलब्ध असलेला पाणी साठा प्राधान्याने पिण्याच्या पाण्यासाठी राखून ठेवण्याबाबत राज्याचे मुख्य सचिव यांनी निर्देश दिले आहेत.

(४) हे खरे नाही.

(५) हे खरे नाही.

तहसिलदार व गट विकास अधिकारी, जिल्हा परिषद यांच्याकडून संयुक्त पाहणी झाल्यानंतर अधिग्रहणाबाबतचा प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर उप विभागीय अधिकारी यांच्या मार्फत त्वरित मंजूरी देण्यात येते.

(६) प्राप्त प्रस्तावाची नियमानुसार तपासणी करुन तात्काळ प्रस्ताव मंजूर करण्यात येत असल्यामुळे दोषी अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कारवाई करण्याबाबतचा प्रश्न उद्भवत नाही.

पिण्याच्या पाण्याची टंचाई हाताळण्याच्या दृष्टीने पिण्याच्या पाण्याची टंचाई कृती आराखडयानुसार आवश्यकतेनुसार टंचाई अंतर्गत उपाययोजना राबविण्यात येत आहेत.

(७) व (८) मा.मुख्य सचिव यांनी दिलेल्या निर्देशानुसार राज्यातील टंचाई कालावधीत पाणी साठयाचे नियोजन करण्याबाबत कळविण्यात आले आहे.

राज्यातील पाणी टंचाई कायमस्वरुपी दूर होण्याच्या दृष्टीने राज्यात राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम, मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रम व जलस्वराज्य अंतर्गत विविध पाणी पुरवठा योजना राबविण्यात येत आहेत.

तसेच मराठवाडयातील पाणीटंचाई वर कायम स्वरुपी मात करण्यासाठी लूप पध्दतीने पाईपलाईनची ग्रीड करुन ठोक स्वरुपात पाणी सर्व गावांजवळ पोहचणे असा प्रस्ताव तयार करण्यात आला आहे. त्याबाबत मे. मेकोरोट या कंपनी बरोबर करार करण्यात आला असून प्रकल्पाबाबत या कंपनीने प्राथमिक सविस्तर अहवाल शासनास सादर केला आहे.

(९) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नंदूर व आंधळगांव (ता.मंगळवेढा, जि.सोलापूर) प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजनेची दुरूस्ती करण्याबाबत

**(२२) * १४०००४ श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मंगळवेढा (जि.सोलापूर) तालुक्यात भीषण पाणी टंचाई असून भोसे प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेतील मुख्य जलवाहिनीची ३ ठिकाणी तर वितरिकेची २ ठिकाणी पाण्याची गळती होत असल्याने २९ गांवातील नागरीकांना पाण्यासाठी भटकंती करावी लागत असल्याचे दिनांक १३ मे, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी वीज पुरवठा खंडीत होत असल्यामुळे वारंवार मोटर जळण्याचे प्रकार होत असून नंदूर व आंधळगांव येथील बंद असलेली प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजना अद्याप दुरूस्त करण्यात आली नसल्याचे दिनांक ५ एप्रिल, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजनांसाठी लागणारा अंदाजे रुपये ७४ लक्ष इतका निधी मंजूर असतांना देखील अधिकाऱ्यांच्या दिरंगाईमुळे दुरूस्तीस विलंब केला जात असल्याचे निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त मुख्य जलवाहिनीची तातडीने दुरूस्ती करून पाणी पुरवठा सुरळीत करणेबाबत लोकप्रतिनिधींनी शासनाकडे विनंती करूनही अद्याप त्याबाबत कोणतीच कार्यवाही केली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, पाणी पुरवठा सुरळीत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) हे खरे नाही.

(२) अंशतः खरे आहे.

भोसे प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेचा पुर्व मौसमी पाऊस व वादळी वाऱ्यामुळे विज पुरवठा खंडीत झाला होता.

नंदुर योजनेची दुरुस्ती करुन दिनांक ०५/०४/२०१९ पासून पाणी पुरवठा सुरु करण्यात आला आहे व आंधळगाव योजनेचा पाणी पुरवठा दिनांक १०/०५/२०१९ पासून सुरु करण्यात आला आहे.

(३) हे खरे नाही.

(४) हे खरे नाही.

(५) भोसे प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेतील ४० गावे, नंदुर प्रादेशिक योजनेतील ८ व आंधळगाव प्रादेशिक योजनेतील ७ गावांना पाणी पुरवठा सुरु करण्यात आला आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील जलस्त्रोत दुषित करणाऱ्या कंपन्यांवर कारवाई करण्याबाबत

**(२३) * १३७६१९ श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील पावणेदोन लाख जलस्त्रोत दुषीत असल्याचे केंद्रीय पेजयल व स्वच्छता मंत्रालयाच्या राष्ट्रीय ग्रामिण पेयजल कार्यक्रमांतर्गत केलेल्या तपासणी अहवालात माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त तपासणी अहवालात राज्यातील ५ लाख ९२ हजार ७४३ जलस्तोत्रांपैकी ४ लाख ६६ हजार ८९३ जल स्तोत्रांची तपासणी करण्यात येऊन ९९ हजार ६०९ जलस्तोत्रांवर सर्वाधिक रासायनीक प्रभाव तर ७१ हजार ८७५ जल स्तो्त्रांवर जिवाणूजन्य प्रादुर्भाव असल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त तपासणी अहवालात उद्योगधंद्यांनी पाण्यातील रसायनांची योग्य प्रकारे विल्हेवाट न लावल्यामुळे जलस्तोत्र दुषीत झाले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, जलस्तोत्र दुषित होण्यास कारणीभूत असणाऱ्या उद्योगांवर कारवाई करुन जलस्तोत्रांचे रासायनिक प्रदुषण रोखण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

(३) हे अंशत: खरे आहे.

(४) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत मार्च व एप्रिल, २०१९ या महिन्यांमध्ये १९५ कारखान्यांना कारणे दाखवा नोटीस व १८५ कारखान्यांना प्रस्तावित निर्देश तसेच १०२ कारखान्यांना उत्पादन बंद करण्याचे आदेश पारित करण्यात आले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## रसायनी (ता.पनवेल. जि.रायगड) येथील बीपीसीएल व हिंदूस्थान ऑर्गनिक केमिकल कंपनीत वायु गळती होऊन प्राणी व पक्षांचा झालेला मृत्यू

**(२४) * १३५५५२ श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व), श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.सुभाष साबणे (देगलूर), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रसायनी (ता.पनवेल, जि.रायगड) येथील बीपीसीएल व हिंदूस्थान ऑर्गनिक केमिकल कंपनीत इस्त्रोसाठी इंधन निर्मितीचे काम सुरु असल्याने इंधनाच्या टाकीतून माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान अचानक वायू गळती होऊन ७६ माकड व कबुतरांसह इतर १०० पक्षांचा मृत्यू झाला हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कंपनी व्यवस्थापनाने वनविभागाच्या अधिकाऱ्यांना कोणतीही सूचना न देता परस्पर मृत माकड व कबुतरांना कंपनीच्या आवारात पुरून पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न केल्याची बाब पत्रकारांनी निदर्शनात आणल्यानंतर वनविभागाने चौकशी करून अधिक माहितीसाठी माकडांचे व कबुतरांचे मृत अवशेष विशेष फॉरेन्सिक लॅबकडे पाठविले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांनी वायुगळतीमुळे ब्रेन हॅमरेज होऊन या प्राण्यांचा मृत्यू झाल्याचे तसेच वन विभागास फॉरेन्सिक लॅबकडून प्राप्त झालेल्या अहवालात या प्राण्यांच्या व पक्ष्यांच्या मृत्यूला वायु गळती जबाबदार असल्याचे स्पष्ट करण्यात आले असल्याने एचएससी व बीपीसीएलकंपनीवर कठोर कारवाई करण्याची मागणी प्राणीमित्रांनी वन विभागाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच याप्रकरणी कंपनीने रसायनांची गळती झाल्याचे मान्य केले असून त्यातून वन्यजीवांना बाधा झाल्याचे म्हटले असून तसा अहवाल कंपनी व्यवस्थापनाने सादर करुनही वन विभागाने संबंधित कंपनीविरोधात कोणतीही कारवाई केलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) होय.

पशुवैद्यकीय अधिकारी पनवेल व उपवनसंरक्षक अलीबाग यांच्या अहवालानुसार मौजे पोसरी येथील हिंदूस्थान ऑर्गनिक केमिकल कंपनीत अचानक वायू गळती होवून त्यामध्ये ३१ माकडे व १४ कबुतर मृत्यू झाली आहेत.

(२) होय.

दिनांक १७.१२.२०१८ रोजी सदरचे अवशेष संचालक, न्याय सहाय्यक वैज्ञानिक प्रयोग शाळा यशवंत नगर, कलीना, सांताकृझ, मुंबई येथे सादर करण्यात आले आहे.

(३) अंशत: खरे आहे.

या वन्यप्राण्यांच्या मृत्यूचे नेमके कारण फॉरेंसिंक लॅब व पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांनी दिलेले नाही. मात्र एच.ओ.सी.एल. कंपनीचे अधिकाऱ्यांनी वायू गळतीमुळे माकडे/कबुतरे मृत्यू पावल्याचे नमूद केलेले आहे.

(४) हे खरे नाही. सदर घटनेबाबत वन विभागाने भारतीय वन्यजीव (संरक्षण) अधिनियम १९७२ कलम ९,३९,५२ व ५८ नुसार प्रथम रिपोर्ट क्र.१/१८-१९ दिनांक १५.१२.२०१८ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. तसेच औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयामार्फत भोगवटादाराविरुध्द खटला न्यायालयात दाखल करण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात महाराष्ट्र राज्य आंतरराष्ट्रीय शिक्षण मंडळाशी संलग्न शाळांमधील शिक्षकांच्या प्रशिक्षणाबाबत

**(२५) * १३५९१७ श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्री.संजय कदम (दापोली), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.दिलीप सोपल (बार्शी), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.प्रदीप नाईक (किनवट), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात महाराष्ट्र राज्य आंतरराष्ट्रीय शिक्षण मंडळाची स्थापना करण्यात येऊन या मंडळाशी संलग्न झालेल्या शाळांतील शिक्षकांचे प्रशिक्षण माहे मे, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीत घेण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रशिक्षणासाठी प्रत्येक शिक्षकाला २५ हजार रुपये शुल्क भरावे लागणार असून हा खर्च शिक्षक किंवा संस्थेलाच करावा लागणार असून संबंधीत संस्थेला किंवा शाळांना संलग्नता शुल्क २० हजार रुपये, ५० हजार रुपये मुल्यांकन शुल्क तसेच १० हजार रुपये नूतनीकरणाचे दरवर्षी भरावे लागणार आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या योजनेला राज्यातील बऱ्याच शाळांनी नकार दिला आहे, हे ही खरे आहे काय, असल्यास त्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, या संदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास त्यात काय आढळून आले व तदनुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आशिष शेलार :** (१) हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## उल्हास नदीतील (ता.कल्याण, जि.ठाणे) जलपर्णी कुजून पाणी प्रदुषित झाल्याबाबत

**(२६) * १३५३९५ श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्रीमती ज्योती कलानी (उल्हासनगर), श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तापमानात वाढ झाल्यामुळे उल्हास नदीच्या (ता.कल्याण, जि.ठाणे) पाण्याची पातळी खालावल्याने नदीतील जलपर्णी कुजून दुर्गंधी पसरली आहे, तसेच कुजलेल्या जलपर्णीपुळे पाणी प्रदुषित झाल्याने नागरिकांना दुषित व दुर्गंधीयुक्त पाणीपुरवठा होत असून आगामी काळातही कल्याण-डोंबिवलीसह अन्य शहरांना दुषित पाणी पुरवठा होण्याची शक्यता निर्माण झाल्याचे दिनांक २३ एप्रिल, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच सदर नदीत शहरांमधील सांडपाण्यावर प्रक्रिया न करता पाणी सोडले जात असल्याने नदी प्रदूषित होत असल्याची तक्रार वनशक्ती संस्थेने माहे जानेवारी, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, बदलापूरची दुसरी सांडपाणी प्रक्रिया योजना प्रलंबित असून अंबरनाथमधील एमआयडीसीचे प्रक्रिया केंद्रही बंद आहे, कल्याणजवळील मोहने येथे बंधारा असून तेथून ठाणे, भिवंडी, मीरा-भाईंदर, कल्याण-डोंबिवली आणि उल्हासनगर महानगरपालिकांसह अंबरनाथ व बदलापूर एमआयडीसीलाही पाणीपुरवठा केला जात असल्याने येथील नागरिकही दुषित पाण्यामुळे त्रस्त झाले आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उल्हास व वालधुनी नदी प्रदुषणाबाबत स्थानिक प्रशासन व सरकारी यंत्रणाना अपयश आले याबाबत सर्वोच्च न्यायालयाने पर्यावरण खात्याच्या सचिवांना दर १५ दिवसांनी बैठक घेऊन अहवाल सादर करण्याचे आदेश दिले असल्याचे माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, हरित लवादाने कल्याण-डोंबिवली महापालिका, उल्हासनगर महापालिका, अंबरनाथ आणि कुळगाव बदलापूर नगरपालिका आणि महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांना दोषी धरीत १०० कोटी रुपयांचा दंड ठोठावला होता, हे हि खरे आहे काय,
(६) असल्यास, उपरोक्त प्रकरणी विभागाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली तसेच प्रश्न भाग (४) बाबत मा.सचिवानी आज पर्यंत किती बैठका घेतल्या व उल्हास व वालधुनी नदीतील प्रदूषण रोखण्याकरिता काय उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. रामदास कदम :** (१) याबाबतचे वृत्त दिनांक २०/०२/२०१९ रोजीच्या दैनिक वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द झाले होते.
(२) हे खरे नाही.
(३) हे अंशत: खरे आहे.

(४) मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल सिव्हिल अपिल क्र. १०५८२/२०१७ (उल्हासनगर महानगरपालिका वि. वनशक्ती पब्लिक ट्रस्ट) मध्ये मा.न्यायालयाने उल्हास नदीमध्ये सोडण्यात येणाऱ्या सांडपाण्यावर प्रक्रिया यंत्रणा उभारण्याकरिता आयुक्त उल्हासनगर महानगरपालिका, इतर आयुक्त व अन्य यंत्रणा करत असलेल्या कामाचा आढावा सचिव (पर्यावरण) यांनी दर १५ दिवसांनी घेण्याचे निर्देश दिनांक १०/०४/२०१९ रोजी दिले आहेत.

(५) मा.राष्ट्रीय हरीत लवाद, पश्चिम विभाग, पुणे यांनी वनशक्ती पब्लिक ट्रस्टने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ व इतर यांचेविरुध्द दाखल केलेल्या मुळ अर्ज क्र.३७/२०१३ मध्ये दिनांक २/०७/२०१५ अन्वये पारित केलेल्या आदेशानुसार महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाला रु. १० कोटीची बँकेची हमी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे जमा करण्याबाबत आदेश दिले होते. तसेच उल्हासनगर महानगरपालिका व कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांना प्रत्येकी रु. १५ कोटी आणि अंबरनाथ नगरपालिका आणि कुळगाव बदलापूर नगरपालिका यांना प्रत्येकी रु. ५ कोटी विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांच्याकडे जमा करण्याबाबत आदेश दिले होते

(६) • मा.हरित लवादाने ठोठावलेल्या दंडाविरुध्द उल्हासनगर महानगरपालिकेने मा. सर्वोच्च न्यायालयात सिव्हिल अपिल क्र. १०५८२/२०१७ दाखल केले असून सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

• मा.न्यायालयाने दिनांक १०/०४/२०१९ रोजी दिलेल्या निर्देशास अनुसरुन मा. प्रधान सचिव (पर्यावरण) यांच्या अध्यक्षतेखाली अद्यापपर्यंत ३ आढावा बैठका घेण्यात आल्या आहेत. सदर बैठकांमध्ये संबंधित यंत्रणांनी मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानूसार विहीत मुदतीत कार्यवाही करण्याबाबत आदेश देण्यात आले आहेत.

(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कोल्हापूर जिल्हयातील अनेक तालुक्यांमधील शाळांमध्ये शालेय पोषण आहाराचे धान्य मिळत नसल्याबाबत

**(२७) * १३६३६० श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सत्यजीत पाटील-**

**सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात प्राथमिक शाळांतील विद्यार्थ्यांना मध्यान्ह पोषण आहार देण्याची योजना सुरु केलेली असून शाहुवाडी (जि.कोल्हापूर) तालुक्यातील ठेकेदार बदलला असल्याने मध्यान्ह पोषण आहार योजना बंद करण्यात आली असल्याचे माहे जानेवारी २०१९ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, चंदगड, आजरा, गगनबावडा, पन्हाळा (जि.कोल्हापूर) तालुक्यामध्ये शालेय पोषण आहारासाठी धान्य व पूरक आहार पुरवठा करणाऱ्या ठेकेदाराची मुदत संपल्याने प्राथमिक शाळांतील पोषण आहार सध्या उसनवारी तत्वावर सुरु असल्याचे माहे फेब्रुवारी, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, शासनाकडून धान्य पुरवठयाबाबत आदेश निघूनही तांत्रिक अडचणीमुळे धान्य व पूरक आहार पुरवठा सक्षमपणे होत नसल्यामुळे जिल्हयातील ७० ते ८० हजार विद्यार्थ्यांना आहार मिळत नसल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्याअनुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यांत येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहते ?

**ॲड. आशिष शेलार :** (१) हे खरे नाही.

(२) अंशत: खरे आहे.

(३) हे खरे नाही

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पारनेर व कोपरगांव (जि.अहमदनगर) येथील पाणी टंचाईबाबत

**(२८) * १४००३४ श्री.संग्राम जगताप (अहमदनगर शहर), श्रीमती स्नेहलता कोल्हे (कोपरगाव) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पारनेर व कोपरगांव (जि.अहमदनगर) तालुक्यात पाणी टंचाई निर्माण झाली असून येथील भूजल पातळी अधिक खालावल्याने रु. १५.१६ कोटी रक्कमेच्या पुरवणी आराखडा सादर केला असून त्यामध्ये पारनेर तालुक्यातील २१ टंचाईग्रस्त गावे व ७४ वाडयांचा तसेच कोपरगाव तालुक्यातील ४ टंचाईग्रस्त गावांचा समावेश असून ५ उपाययोजना प्रस्तावित असल्याचे माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोपरगांव जिल्हा अहमदनगर येथील धारणगांव पाणी पुरवठा योजनेचे काम अनेक वर्षापासून प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार उक्त प्रस्तावित योजना पूर्ण होण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) धारणगांव व इतर चार गावे प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेस प्रशासकीय मान्यता देऊन दि. ६.०१.१९९९ रोजी कार्यादेश देण्यात आले. अपूरा निधी, कामात झालेल्या बदलामुळे कामास विलंब झाला आहे.

धारणगांव योजनेची ६५ % कामे पूर्ण झाली असून योजनेच्या खर्चात वाढ झाल्यामुळे दि. १०.२.२०१० रोजी सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात आली. तसेच योजनेस पुनर्सुधारित मान्यता देण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अलिबाग व पेण (जि.रायगड) तालुक्यातील पाणी टंचाईबाबत

**(२९) * १३५८७५ श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यातील शहापाडा व उमटे धरणातील पाणी पातळी खालावल्यामुळे अलिबाग व पेण तालुक्यात एक दिवसआड पाणीपुरवठा होत असल्याचे माहे मार्च, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार या तालुक्यातील पाणी टंचाई दूर करण्याकरिता शासनाने कोणत्या विशेष उपाययोजना आखल्या आहेत, त्याची सद्यःस्थिती काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) हे खरे आहे.

(२) अलिबाग व पेण (रायगड) या दोन तालुक्यातील पिण्याचे पाणी टंचाई कालावधीमध्ये पाणी टंचाई कृती आराखडा सन २०१८-१९ तयार करुन मंजूरी घेतली आहे. त्याअंतर्गत अलिबाग तालुक्यात १५ गावे व ८९ वाडयांमध्ये एकूण १०४ उपाययोजना व पेण तालुक्यात ५४ गावे व २०३ वाडयांमध्ये एकूण २५७ उपाययोजना प्रस्तावित करण्यात आल्या आहेत. त्यानुसार टंचाईअंतर्गत उपाययोजना पूर्ण करुन अलिबाग व पेण या तालुक्यातील पाणी टंचाई हाताळण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईसह राज्यातील नामांकित पंचतारांकित हॉटेल्स आणि रेस्टॉरंटमध्ये तयार होणारे अन्न खाण्यास असुरक्षित असल्याबाबत

**(३०) * १३५४१७ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.जगदीश मुळीक (वडगाव शेरी) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई, पुणे तसेच राज्यातील नामांकित पंचतारांकित हॉटेल्स आणि रेस्टॉरंटमध्ये तयार होणारे अन्न खाण्यास असुरक्षित असल्याचे आढळून आल्याने यामध्ये नियमाचे उल्लंघन केल्याप्रकरणी, अन्न व औषध विभागाने राज्यातील सुमारे अडीच हजार हॉटेल्सना दिनांक २८ डिसेंबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास नोटीस दिल्याचे निदर्शनास आले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू प्रकरणी पाहणी अहवालाचे निष्कर्ष काय आहेत, त्यानुसार नियमाचे उल्लंघन केलेल्या व नोटीस बजावलेल्या हॉटेल्सवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, किती व कोणत्या दोषी हॉटेल्स विरुध्द काय कारवाई केली तसेच अन्न पदार्थांचा दर्जा खाण्यास सुरक्षित राहण्याच्या दृष्टीने कोणत्या उपाययोजना केल्या आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) व (३) अन्न व औषध प्रशासनाने राबविलेल्या विशेष तपासणी मोहिमे अंतर्गत राज्यात एकूण ३५७९ हॉटेल व रेस्टॉरंट यांच्या तपासण्या करण्यात आल्या आहेत. त्यापैकी ३४५७ हॉटेल व रेस्टॉरंटनी अन्न सुरक्षा व मानदे कायदा २००६ मधील तरतुदींचे उल्लंघन केल्याचे आढळून आल्याने सदर आस्थापनांना सुधारणा नोटीसा बजाविण्यात आल्या आहेत. त्यापैकी ५९९ आस्थापनांनी त्यानुसार सुधारणा न केल्याने त्यांचे परवाने ठराविक कालावधीकरीता निलंबित करण्यात आलेले आहेत. अन्न पदार्थाचा दर्जा खाण्यास सुरक्षित राहण्याच्या दृष्टिने वेळोवेळी सुधारणा नोटीसा बजावण्यात येत आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात मोफत वापराच्या औषधांची व्यावसायिक विक्री करणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत

**(३१) * १३७१७७ श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमर काळे (आर्वी),**

**श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.नसीम खान (चांदिवली), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.संदीपानराव भुमरे (पैठण), श्री.भरतशेठ गोगावले (महाड), श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शासकीय रुग्णालयांतील मोफत वापराच्या औषधांची अधिकाऱ्यांच्या संगनमताने खुल्या बाजारात व्यावसायिक विक्री होत असल्याचे दिनांक १८ मार्च, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नवी मुंबईतील अन्न व औषध प्रशासनाने माहे फेब्रुवारी, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान ठिकठिकाणी टाकलेल्या धाडीमध्ये सानपाडा (नवी मुंबई) तसेच तळोजा (जि.रायगड) येथील कारवाईत मेडलॅब कंपनीत शासनाने वापरावयाची १७ लाख रुपये किंमतीची औषधे आढळून आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मधुमेहावरील उपचाराचे गॅलवॉज ५० नावाचे औषध हे शासकीय रुग्णालये, कामगार रुग्णालये तसेच संरक्षण विभागासाठी नोवार्टीकडून मागविली जात असून सदर औषधावर ही औषधे विक्रीसाठी नाही असा मारलेला स्टॅम्प पुसून औषधांची विक्री होत असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, संपुर्ण देशात अशा प्रकारे औषधांची विक्री होत असल्याची बाब गुन्हे शाखेच्या मध्यवर्ती कक्षाच्या निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार याप्रकरणी जबाबदार असणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, तसेच अशा प्रकारांना आळा घालण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल :** (१) व (२) मेडलाईफ इंटरनॅशनल प्रा.लि. एम.आय.डी.सी. तळोजा, नवी मुंबई या कंपनीमधून "संरक्षण दल/राज्य कामगार विमा योजना रुग्णालय / शासकीय रुग्णालयासाठी व विक्रीसाठी नाही." अशा आशयाचा मजकूर खोडलेला अंदाजे रु.१७ लाख इतक्या किंमतीचा औषधाचा साठा जप्त केला आहे.

(३) होय.

(४) हे अंशत: खरे आहे.

(५) सदर प्रकरणी अन्न व औषध प्रशासनाने चौकशी केली असून बृहन्मुंबई, ठाणे व पुणे विभागातील ३० घाऊक औषधी विक्री परवाना धारकाचे परावाने रद्द केले आहेत. तसेच सदर प्रकरणी पोलिसांकडे गुन्हा नोंदविला असून पोलिसांनी ११ आरोपींना अटक केली आहे.

अशा प्रकारांना आळा घालण्याकरीता शासकीय रुग्णालयात वापर करण्यात येणाऱ्या औषधांवर विक्री किंमत नमूद करु नये, विशिष्ट रंगाचे ओळख चिन्ह छापन्यात यावे, बारकोड नमूद करण्यात यावा अशा सूचना अन्न व औषध प्रशासनाने संबंधितांना दिल्या आहेत.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नाशिक येथे चुकीच्या आधार कार्ड क्रमांकाशी शिधापत्रिका जोडल्या गेल्याने लाभार्थी धान्यापासून वंचित राहिल्याबाबत

**(३२) * १३६७३७ श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक येथे शिधापत्रिका चुकीच्या आधार कार्ड क्रमांकाशी जोडले गेल्याने लाभार्थी धान्यापासून वंचित रहात असल्याचे माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास रेशनच्या धान्याचा अपहार करण्यासाठी ही नविन क्लृप्ती शोधली गेली असून आधार क्रमांकाच्या लिकींगमध्ये गैरव्यवहार करणारे रॅकेट कार्यरत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच आधार लिंकींगसाठी शासनाकडून जिल्हा प्रशासनास अनुदान दिले जात असून देखील आधार लिंकींगसाठी रेशन दुकानदारांकडून पैशाची मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणाची चौकशी करुन संबधित दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर :** (१) हे खरे नाही.

राज्यात सार्वजनिक वितरण व्यवस्थचे संगणकीकरण प्रकल्पातंर्गत Aadhar enabled Public Distribution System (AePDS) प्रणालीचा वापर करुन ई-पॉसद्वारे पात्र लाभार्थ्यांची बायोमेट्रिक ओळख पटवून शिधावस्तुंचे वितरण करण्यात येत आहे. नाशिक जिल्हयात कोणताही पात्र लाभार्थी धान्यापासून वंचित राहिल्याची बाब निदर्शनास आलेली नाही. कोणताही पात्र लाभार्थी अन्नधान्यापासून वंचित राहणार नाही, याबाबत योग्य दक्षता घेण्याचे आदेश सर्व क्षेत्रीय कार्यालयांना देण्यात आले आहेत.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## भिवंडी, ठाणे येथे दहावीच्या विज्ञान-१ व इतिहास विषयाच्या प्रश्नपत्रिका व्हायरल झाल्याबाबत

**(३३) * १३५२४७ श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) काल्हेर (ता.भिवंडी, जि.ठाणे) येथील परशुराम धोंडू टावरे विद्यालयात दिनांक २० मार्च, २०१९ रोजी दहावीची परिक्षा सुरु होण्यापूर्वी पेपर फुटल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, व्हॉट्सॲप वरून प्रश्नपत्रिका व्हायरल होऊ नयेत याकरिता राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळातर्फे विशेष काळजी घेऊनही भिवंडी, ठाणे येथे दहावीच्या विज्ञान-१ व इतिहास या विषयाच्या प्रश्नपत्रिका परीक्षे अगोदर ५० मिनिटे म्हणजे १० वाजून १० मिनिटांनी व्हाटॲपस वर उपलब्ध झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, शहरातील काही विद्यार्थ्यांना परीक्षेच्या आदल्या दिवशीच प्रश्नपत्रिका उपलब्ध होणार असल्याचे समजले असल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, पेपरफुटी प्रकरणी पोलीस स्थानकात तक्रार दाखल झाली असून एका कोचिंग क्लास चालकाला अटक केले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली तसेच पेपरफुटी रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आशिष शेलार :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

(४) हे खरे आहे.

(५) सदर प्रकरणी पोलिस स्टेशन, भिवंडी येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर प्रकरणी दोषी व्यक्तींवर कारवाई करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. परिक्षेमध्ये गैरप्रकार होऊ नयेत, याची खबरदारी घेण्याच्या सूचना परिक्षेशी संबंधित सर्व घटकांना देण्यात आल्या आहेत.

-----------------

## परभणी जिल्हयासह राज्यातील शाळांना देण्यात येणारे आरटीई प्रवेशाचे प्रतिपूर्ती शुल्क थकीत असल्याबाबत

**(३४) * १३४९०२ ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.नरेंद्र महेता (मिरा भाईंदर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर), श्री.संजय केळकर (ठाणे), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शाळांना शिक्षण हक्क कायद्यानुसार विद्यार्थ्यांच्या प्रवेशासाठी देण्यात येणारे प्रतिपूर्ती शुल्काचे ९०० कोटी रुपये थकीत असल्याचे माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आरटीई प्रतिपूर्ती शुल्क न मिळाल्यामुळे पायाभूत सुविधांसाठी शाळांना आर्थिक कसरत करावी लागत असून आरटीईच्या २५ टक्के राखीव जागांचे प्रमाण १० टक्के करण्याची मागणी खासगी शाळांनी केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच परभणी जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाकडून जिल्हयातील इंग्रजी शाळांना गत २ वर्षापासून शिक्षण हक्क कायद्यांतर्गत राखीव कोटयातून २५ टक्के प्रवेश दिलेल्या विद्यार्थ्याच्या शैक्षणिक शुल्काचा परतावा देण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाच्या परिपत्रकानुसार आरटीई अंतर्गत ५० टक्के शुल्क अदा करण्याचे सुचविले असतांनाही जिल्ह्यातील इंग्रजी माध्यमांच्या शाळांना आरटीईचा परतावा न देण्याची कारणे काय आहेत, तसेच परतावा मिळत नसल्याने शाळा संस्थाचालकांना विविध समस्यांना सामोरे जावे लागत असल्यामुळे संस्थाचालकांनी परभणी जिल्हा परिषदेच्या अध्यक्षांची प्रत्यक्ष भेट घेऊन आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) तसेच, राज्यातील आरटीईच्या प्रवेशासाठी पहिल्या लॉटरीतुन ६७ हजार ७०६ विद्यार्थ्यांना प्रवेश जाहिर होवूनही दिनांक २३ एप्रिल, २०१९ अखेर केवळ २३ हजार ५९४ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला असून उक्त प्रवेशासंदर्भातील तक्रारी प्राथमिक शिक्षण विभाग जिल्हा परिषद, पुणे यांच्याकडे प्राप्त झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार आरटीई प्रतिपूर्ती शुल्काची थकीत असलेली रक्कम तसेच परभणी जिल्ह्यातील इंग्रजी शाळेच्या संस्थाचालकांना आरटीईचा परतावा देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आशिष शेलार :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

(४) व (५) अंशत: खरे आहे.

(६) आवश्यक कार्यवाही करण्यात येत आहे.

-----------------

## रायगड जिल्ह्यातील आदिवासी पाड्यांना पाणी पुरवठा करण्याबाबत

**(३५) * १३८३६८ श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.मनोहर भोईर (उरण), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नेरळ (ता.कर्जत, जि.रायगड) येथे ओलमण ग्रामपंचायती अंतर्गत येणाऱ्या बोंडशेत तसेच रायगड जिल्ह्यातील इतर आदिवासी वाड्यांमध्ये पाणीटंचाई निर्माण झाली असून महिलांना रात्रभर विहिरीवर मुक्काम करून हंडाभर पाणी जमा करावे लागत असल्याचे माहे मे, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कर्जत तालुक्यातील (जि.रायगड) अनेक जलवाहिन्या नादुरुस्त असणे, खांडस येथे पाझर तलाव असूनही खांडस गावासह तालुक्यातील (जि.रायगड) नांदगाव ग्रामपंचायत हद्दीतील सहा तसेच आसल ग्रामपंचायतीच्या हद्दीतील नऊ आदिवासी पाडयांमधील महिलांना कित्येक किलोमिटर पाण्यासाठी पायपीट करावी लागत असल्याचे माहे मे, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्ह्यातील वाडयांना पाणी उपलब्ध होण्यासाठी नवीन पाणी पुरवठा योजना सुरु करण्याच्या मागणीसाठी आदिवासी बांधवांनी माहे मार्च, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान कर्जत लघुपाट बंधारे तसेच पंचायत समिती तहसिल कार्यालयावर धडक मोर्चाचे आयोजन करुन निवेदनही सादर केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, कर्जत तालुक्यातील जलवाहिन्या दुरुस्त करुन जिल्ह्यातील पाणी टंचाई दूर करण्याच्यादृष्टीने सदर वाड्यांना टँकरने पाणीपुरवठा तसेच इतर पर्यायी व्यवस्था करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) हे खरे आहे.

ओलमन गट ग्रामपंचायतीअंतर्गत येणाऱ्या बोंडशेत या वाडीमध्ये २ हातपंप, १ दुहेरी विद्युत पंप व २ विहिरी आहेत. त्यापैकी दोन्हीं विहिरींची पाण्याची पातळी खाली गेल्याने विहिरी कोरडया पडल्या असून दुहेरी पंप व हातपंप यांची पाण्याची पातळी खाली गेल्याने पाण्याची आवक कमी झाली आहे. त्यामुळे पाणी टंचाई भासत होती.

(२) अंशत: खरे आहे.

खांडस गावात पाणी टंचाई नाही.

(३) जिल्हयातील वाडयांना पाणी उपलब्ध होण्यासाठी नविन पाणी पुरवठा योजना सुरु करण्याची ग्रामपंचायतींची मागणी आहे.

तथापि धडक मोर्चाचे आयोजन करुन निवेदन सादर केले आहे, हे खरे नाही.

(४) ओलमन गट ग्रामपंचायतीमार्फत बोंडशेत व गट ग्रामपंचायत नांदगाव मार्फत ६ वाडयांना टँकरव्दारे पाणी पुरवठा सुरु करण्यांत आलेला आहे.

तसेच आसल ग्रामपंचायतीतील ९ वाडयांना भुतिवली गावाच्या पाणी योजनेच्या उद्भव विहिरीवर पंप बसवून तात्पुरती व्यवस्था करुन पाणी पुरवठा सुरु केला आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बाळ गंगाधर टिळक यांच्या जीवनावर आधारित असलेल्या मराठी चित्रपटाबाबत

**(३६) * १३६४९९ डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देशावर १५० वर्ष राज्य करणा-या ब्रिटीशांना ''स्वराज्य हा माझा जन्मसिध्द हक्क आहे'' हे निर्भिडपणे सांगणा-या बाळ गंगाधर टिळक यांच्या जीवनावर मराठी भाषेत चित्रपट तयार करण्याचा निर्णय तत्कालीन युती शासनाने घेतल्यानंतर सदर चित्रपट तयार करण्यासाठी शासनाच्या सांस्कृतीक कार्य संचालनालयामार्फत दिनांक १२ मार्च, १९९८ रोजी चित्रपट निर्माते श्री.विनय धुमाळे यांना ५० लाख रुपयांचे अनुदान देण्यात आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनुदान मिळाल्यानंतरही दिनांक २ जुन, २०१४ पर्यंत चित्रपट निर्मात्याने चित्रपट निर्मितीसाठी सुरुवात केलेली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महाराष्ट्र राज्य चित्रपट महामंडळाने याप्रकरणी तज्ञ समितीमार्फत चित्रपट निर्मितीबाबत परिक्षण करुन याबाबतचा अहवालही शासनास सादर केला असून या अहवालात तयार केलेल्या चित्रपटाचा भाग हा दर्जाहीन असल्याचा उल्लेख केलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाच्या सांस्कृतीक कार्य संचालनालयाने या अनुषंगाने निर्माते श्री.विनय धुमाळे यांना नोटीस पाठवून त्यांना दिलेल्या ५० लाख रुपयांच्या अनुदानाप्रती १९९८ ते २०१६ हा कालावधी मिळून अनुदान रक्कम अधिक व्याज २ टक्के वार्षिक दराने असे एकूण १,८२,९६,७२०/- रुपये इतकी रक्कम भरा अन्यथा फौजदारी कारवाई केली जाईल अशी नोटीस दिनांक २५ सप्टेंबर, २०१५ रोजी दिली तसेच दिनांक २३ जानेवारी, २०१७ रोजी स्मरणपत्र पाठवूनही निर्मात्याने अनुदानाची व्याज व दंडव्याजासह झालेली रक्कम सांस्कृतीक कार्य संचालनालयास परत केलेली नसल्याने चित्रपट निर्मात्यावर फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे काय,

(५) तसेच याप्रकरणी जबाबदार असणा-या व निर्मात्यास सहकार्य करणा-या संबंधित विभागाच्या किती अधिकारी व कर्मचा-यांना निलंबित करण्यात आले आहे व त्यांच्यावरील कारवाईची सद्यःस्थिती काय आहे ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे आहे.

दि.२३ जून, २०१४ रोजी महाराष्ट्र राज्य चित्रपट महामंडळाने या प्रकरणी तज्ञ समितीमार्फत चित्रपट निर्मितीबाबत परिक्षण करुन, चित्रपट सुमार दर्जाचा व चित्रपट बनविण्याचा उद्देश सफल झालेला नसल्याबाबतचा अहवाल शासनास सादर केला आहे.

(४) होय, संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय यांनी त्यांच्या दि.२४.०९.२०१५ व दि.२३.०१.२०१७ च्या पत्रांन्वये श्री.धुमाळे यांना वसूली करावयाची रक्कम जमा करावी अन्यथा फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येईल असे कळविले होते. तथापि, श्री.धुमाळे यांनी अनुदानाची व्याजासह रक्कम भरणा न केल्याने त्यांच्यावर दि.२२.१०.२०१८ रोजी गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बाळापूर (जि.अकोला) तालुक्यातील पाणी टंचाई दूर करण्याबाबत

**(३७) * १३८४९० श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बाळापूर (जि.अकोला) तालुक्यातील अनेक गावांमध्ये पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण झाली असून जनावरांच्या चाऱ्यांचीही समस्या निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तालुक्यातील ८० गावांपैकी २० पेक्षा अधिक गावांना टँकरने पाणी पुरवठा करावा लागणार असल्याची बाब माहे एप्रिल, २०१९ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर तालुक्यातील गावांना पाणी पुरवठा करणारे एकूण ८० पेक्षा अधिक हातपंप नादुरुस्त असूनही त्याकडे पाणी पुरवठा विभागाचे अधिकारी दुर्लक्ष करित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, तालुक्यातील पाणी टंचाईवर कायमस्वरुपी तोडगा काढण्याबाबत शासनाने काय उपाययोजना केली आहे त्याचे थोडक्यात स्वरुप काय आहे,

(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) अंशत: खरे आहे.

पिण्याच्या पाण्याची टंचाई आहे. मात्र चारा टंचाई नाही.

(२) अंशत: खरे आहे.

बाळापूर तालुक्यातील मौजे मोरगांव सादिजन, वाडेगाव, पिंपळगाव, तामशी, तांदळी तर्फे तुलंगा या गावांना टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्यात येत आहे.

(३) हे खरे नाही.

माहे एप्रिल, २०१९ अखेर ५ गावांतील ११ हातपंप दुरुस्ती करुन पाणी पुरवठा सुरु करण्यात आलेला आहे. तसेच तालुक्यात पाण्याची पातळी १२० फुटांपेक्षा खाली गेल्यामुळे ३१ हातपंप बंद पडलेले आहे. सदर गावांत इतर हातपंप व नळ पाणी पुरवठा योजनेद्वारे पाणीपुरवठा सुरु आहे.

(४) तालुक्यात पिण्याच्या पाण्याच्या टंचाईवर कायमस्वरुपी तोडगा काढण्यासाठी ग्रामपंचायतीच्या मागणीनुसार मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रम व राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत नळ पाणी पुरवठा योजनेची कामे केली जात आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बुलढाणा जिल्हयामध्ये सार्वजनिक वितरण प्रणाली अंतर्गत सीएमआर तांदूळ वाहतुक करताना नियमांचे उल्लघन होत असल्याबाबत

**(३८) * १३५३६६ श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्हयामध्ये सार्वजनिक वितरण प्रणाली अंतर्गत सीएमआर तांदूळ वाहतुक करताना नियमांचे उल्लंघन होत असल्याची बाब दिनांक १५ फेब्रुवारी २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बुलढाणा जिल्हयात सदर तांदूळ वाहतूक करण्यासाठी दिनांक ४ फेब्रुवारी, २०१९ रोजी शासकीय आदेश देण्यात आला होता मात्र सदर आदेशाला दहा दिवस पूर्ण होत नाही तोच सर्व अटी आणि शर्तीचा भंग करून पुन्हा तांदूळ वाहतूक करण्यात आल्याचे खामगाव येथे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निदर्शनास आले व त्यानुसार बुलढाणा जिल्हयामध्ये सार्वजनिक वितरण प्रणालींतर्गत सीएमआर तांदूळ वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या संबंधित वाहतूकदार व त्याला सहकार्य करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कोल्हापूर, इचलकरंजी व सांगली या शहरांमध्ये औद्योगिक वसाहतीमधून दुषित पाणी सोडण्यात येत असल्याबाबत

**(३९) * १३७७५० श्री.उल्हास पाटील (शिरोळ), श्री.अमल महाडीक (कोल्हापूर दक्षिण), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर, इचलकरंजी, सांगली या शहरांमध्ये औद्योगिक वसाहतीचे सांडपाणी प्रक्रिया न करता थेट नदीत सोडल्याने कृष्णा व पंचगंगा नदीचे पाणी दुषित होऊन शिरोळ तालुक्यातील शेतकऱ्यांच्या शेतजमीनी व नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम होऊन महिलांमध्ये स्तन, गर्भाशय आणि पुरुषांना स्तनाचा कर्करोग होण्याची भिती निर्माण झाली असल्याचे तसेच साखर कारखान्यांची मळी नदीत सोडण्यात येत असल्याने पिण्याच्या पाण्याला उसाच्या मळीचा वास येत असून नळाला मळीमिश्रित पाणी येत असल्याचे माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, इचलकरंजी येथील (जि.कोल्हापूर) बोहरा मार्केट नजिक असणा-या काळया ओढयावर नगरपालिकेने ठिकठिकाणी बंधारे बांधल्याने पात्रातील रसायनयुक्त पाणी परिसरात पसरल्यामुळे नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण झाल्याचे माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, काही महिन्यांपूर्वी प्रदूषण नियंत्रण महामंडळाने प्रदूषण करणा-या घटकांवर तसेच प्रशासनातील जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाईचे आदेश देऊनही कोणतीच कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, कर्करोगाचे निदान लवकर व्हावे यासाठी नियमित तपासण्या व उपचार केंद्र उभारण्याची मागणी शिरोळ तालुक्यातील नागरीक करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, पंचगंगा नदी प्रदूषण निर्मुलनासाठी जिल्हा परिषद, कोल्हापूर यांच्याकडून तयार करण्यात आलेल्या रुपये ९४.५० कोटी इतक्या रकमेचा आराखडा मंजूर होणे व पहिल्या टप्प्याच्या कामांसाठी रुपये २० कोटी इतका निधी उपलब्ध होणे गरजेचे असताना अद्यापही यावर शासनाने निर्णय न घेण्याची कारणे काय आहेत,

(६) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) हे खरे नाही.

(२) हे अंशत: खरे आहे.

• पंचगंगा नदी प्रदूषण कमी करण्यासाठी दाखल जनहित याचिका क्र. १८३/२०१२ मधील आदेशानूसार नियुक्त समितीने सुचविलेल्या तात्पुरत्या उपाययोजनांनुसार काळ्या ओढयात नगरपालिकेकडून तात्पुरते बंधारे घालण्यात आलेले आहेत व सदर बंधाऱ्याचा वापर काळ्या ओढ्यातील घरगुती सांडपाण्याचे निर्जंतुकीकरणासाठी व सी. ई. टी. पी. मधील प्रक्रियाकृत सांडपाणी काळ्या ओढ्याशेजारील शेतीसाठी उपसाकरिता करण्यात येते.

(३) हे खरे नाही.

(४) जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर यांनी शिरोळ तालुक्यातील नागरीकांची कर्करोगांचे उपचार केंद्र उभारण्याची मागणी जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर यांच्याकडे प्राप्त झालेली नाही.

(५) पंचगंगा नदी प्रदूषण निमुर्लनसाठी कोल्हापूर जिल्हा परिषदेतंर्गत पहिल्या टप्प्यातील रु. ९४.५० कोटींचा ३१ गावांचा सांडपाणी व ३८ गावांचा घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पास मंजूरी मिळणेबाबतचे पत्र मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर यांचेकडून दिनांक ०१/०६/२०१७ रोजी प्राप्त झाले होते. तथापि, सदर पत्रासोबत प्रकल्प अहवाल व प्रेझेंटेशन प्राप्त न झाल्याने सुधारित प्रकल्प अहवाल व प्रेझेंटेशन पाठविण्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर यांना दिनांक १५/०६/२०१७ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

(६) व (७) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील शासकीय आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमध्ये मुलींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृहे नसल्याबाबत

**(४०) * १३५४६१ श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.संजय केळकर (ठाणे), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.संदीपानराव भुमरे (पैठण), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत), प्रा.(श्रीमती) मेधा कुलकर्णी (कोथरुड), श्री.राहुल बोंद्रे (चिखली) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शासकीय आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या पहिली ते बारावीपर्यंतच्या ६६ हजार ७५० शाळा असून त्यापैकी १६४७ शाळांमध्ये मुलींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृहे नसल्याचे दिनांक ८ एप्रिल, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यु-डायसच्या उपलब्ध माहितीनुसार ६५,१०३ शाळांमध्ये मुलींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृह असून देखील स्वच्छतागृहांची योग्य देखभाल आणि दुरुस्ती होत नसल्याचे निदर्शनास आले आहे काही ठिकाणी स्वच्छतागृहांअभावी व काही स्वच्छतागृहांची दूरवस्था झाली असल्याने किशोरवयीन मुलींची गैरसोय होते, त्यामुळे मुली शाळाबाहय होत आहेत, हे ही खरे आहे काय.

(३) असल्यास, शासन राज्यातील सर्व शाळांमध्ये स्वच्छता अभियान राबवण्यासाठी निधी उपलब्ध करून देणार आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय त्यात काय, आढळून आले व त्यानुषंगाने शाळांमध्ये मुलींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृहे उभारण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आशिष शेलार :** (१) अंशत: खरे आहे.

शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमध्ये आवश्यकता असूनही मुलींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृह उपलब्ध नसणाऱ्या शाळांची संख्या ११८५ आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) शाळांमध्ये आवश्यकतेनुसार व निधी उपलब्धतेनुसार समग्र शिक्षा अभियान, जिल्हा परिषद, जिल्हा नियोजन व विकास समिती, इ.माध्यमांतून स्वतंत्र स्वच्छतागृहांची उभारणी करण्याची तजवीज ठेवली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातील विद्यार्थी शिष्यवृत्ती पासून वंचित राहिल्याबाबत

**(४१) * १३५२१५ डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातील १ लक्ष ५० हजार विद्यार्थी शिष्यवृत्ती पासुन वंचित असल्याचे माहे मे, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाडीबीटीने गत ३ महिन्यांपासून विद्यापीठाच्या परिक्षा शुल्काची नोंद केली नसल्याने विविध शाखेचे दीड लाखाहून अधिक विद्यार्थी शिष्यवृत्ती पासून वंचित राहिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विद्यापीठाच्या अकार्यक्षम कारभारामुळे विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळत नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार उक्त दीड लाख विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

विद्यापीठाव्दारा संचालित व संलग्नित आणि विद्यापीठातील शैक्षणिक विभागातील अभ्यासक्रमाची आणि त्याकरिता आकारण्यात येणा-या शिक्षण शुल्क, परिक्षा शुल्क व इतर शुल्काची माहिती विद्यापीठ प्रशासनाने निर्धारित कालमर्यादेत व विहित प्रपत्रात महाडिबीटी आयटी. विभागास उपलब्ध करुन दिलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अहमदनगर जिल्हयातील पात्र लाभार्थींना अन्न सुरक्षा योजनेत सामावून घेण्याबाबत

**(४२) * १४०४७९ श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्हयातील अन्न सुरक्षा योजना सन २०१३ नुसार माहे मे/जून २०१७ या कालावधीत ७६.३२ टक्के इतका इष्टांक पूर्ण असून अंत्योदय व प्राधान्य कुटुंब योजनेतंर्गत एकूण २७,३०९५ इतक्या लाभार्थ्यांना अन्नधान्य वाटप करण्यात येत होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासन निर्णयानुसार दिनांक २१ मे, २०१८ पूर्वीपासूनच लोकप्रतिनिधींनी दक्षता कमिटीच्या बैठकीत शिल्लक राहिलेल्या लाभार्थ्यांना धान्य कोटा वाढवून देण्याबाबत दिनांक ३ नोव्हेंबर, २०१७ व दिनांक १२ फेब्रुवारी, २०१८ रोजीच्या पत्रान्वये कळवूनही पात्र लाभार्थ्यांची अद्याप निवड करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अधिकाऱ्यांच्या हलगर्जीपणामुळे तालुक्यातील लाभार्थी केंद्र शासनाच्या योजनेपासून वंचित राहिल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, तालुक्याचा इष्टांक ७६.३२ पूर्ण होण्याकामी इष्टांक वाढीची मागणी शासन निर्णय दिनांक २१ मे, २०१८ पूर्वी पासूनची असल्याने याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर :** (१) होय.

(२) सर्व पात्र लाभार्थ्यांना राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेत सामावून घेण्याच्या दृष्टीने जिल्हयाकरिता दिलेल्या एकूण इष्टांकाच्या मर्यादेत, तालुक्याची लोकसंख्या विचारात न घेता तालुका निहाय इष्टांक वाटप करण्यात येत आहे.

(३) प्रस्तुत प्रकरणी शासनस्तरावर छाननी करण्यात येत आहे.

(४) व (५) केंद्र शासनाने राज्यासाठी दिलेला इष्टांक राज्य हा घटक म्हणून विचारात घेण्यात आला असल्याने, ज्या ठिकाणी ग्रामीण भागासाठी ७६.३२ टक्के व शहरी भागासाठी ४५.३४ टक्के या पेक्षा कमी/जास्त पात्र लाभार्थ्यांची निवड होत असेल त्या ठिकाणी या प्रमाणापेक्षा कमी/जास्त इष्टांक देऊन जास्तीत जास्त पात्र लाभार्थ्यांचा समावेश करण्यात येत आहे.

-----------------

## मालेगाव शहरातील (ता.मालेगांव, जि.नाशिक) सैलानी चौकातील घरावर छापा टाकून गुंगी आणणारे औषध जप्त केल्याबाबत

**(४३) * १३९३५५ श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगाव शहरातील (जि.नाशिक) जुना आझादनगर भागातील सैलानी चौकातील नूर हॉस्पीटल समोरील घरावर शहर पोलिसांनी छापा टाकून लाखो रुपये किंमतीचे गुंगी आणणारे औषध व कुत्तागोळी जप्त केल्याचे दिनांक १० मे, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व चौकशी अहवालानुसार संबंधीतांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल :** (१) होय.

(२) सदर प्रकरणी पोलिस व अन्न व औषध प्रशासनाने चौकशी केली असता मालेगाव येथील दोन व्यक्ती विनापरवाना कोडीनयुक्त औषधी व अल्फाझोलमयुक्त औषधी (कुत्तागोळी या नावाने विक्री होत असलेली) चा साठा करुन विक्री / वितरण करत असल्याचे आढळून आले.

सदर औषधाच्या साठ्यातून ६ नमूने विश्लेषणासाठी घेण्यात आले असून अहवाल अद्याप प्रलंबित आहे. तसेच उक्त दोन्ही इसमांविरुध्द शहर पोलिस ठाणे, मालेगाव, जि.नाशिक येथे दि.१०.०५.२०१९ रोजी प्रथम खबर

अहवाल नोदंविला असून गुन्हा क्र.।। ३५/२०१९ असा आहे. पोलिस पुढील तपास करत आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## चिखलोली धरणातील पाणी (ता.अंबरनाथ, जि.ठाणे) दुषित करणाऱ्या १४ कंपन्यांवर गुन्हे दाखल करण्याबाबत

**(४४) * १३७५६६ श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चिखलोली (ता.अंबरनाथ, जि.ठाणे) धरणातील पाणी दुषित करणाऱ्या १४ कंपन्यांवर गुन्हे दाखल करण्याचे आदेश पाणी पुरवठा राज्यमंत्री यांनी माहे जुलै, २०१८ मध्ये देवूनही अद्याप जलसंपदा, पाटबंधारे व महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने या कंपन्यावर कोणतीच कारवाई केली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय निदर्शनास आले, तदनुसार चिखलोली धरणातील पाणी दुषित करणाऱ्या कंपन्यांनावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे तसेच यास जबाबदार असणाऱ्या लघु पाटबंधारे विभाग व संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) ठाणे पाटबंधारे विभागाकडून दिनांक ५/७/२०१८ च्या पत्रान्वये वरिष्ठ पोलीस निरीक्षक अंबरनाथ यांना चिखलोली (ता.अंबरनाथ, जि. ठाणे) धरणातील पाणी दूषित कराणा-या १४ कंपन्यावर गुन्हा दाखल करण्याबाबत कळविले आहे.
(२) या धरणाची पाहणी करण्यात आली असता, कंपनीच्या आवारात रासायनिक गोण्या आढळून आल्या. तसेच पाण्याचे नमुने घेऊन चाचणी करण्यात आली असता, पाण्याच्या नमुन्यात रसायनाचा अंश आढळून आला

नाही. परंतु काही दुषित जैविक घटक पाण्याच्या नमुन्यात असल्याचे दिसून आले. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्याण यांनी दिनांक १२/७/२०१८ रोजी केलेल्या पाहणी दरम्यान चिखलोली धरणाच्या क्षेत्रामध्ये कोणत्याही प्रकारचे औद्योगिकसांडपाणी प्रत्यक्षपणे मिसळत नसल्याचे आढळून आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## दामत ग्रामपंचायतीतील भडवळवाडी (ता.कर्जत, जि.रायगड) येथील पाणी टंचाई दूर करण्याबाबत

**(४५) * १३६०२९ श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.सुनिल केदार (सावनेर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दामत ग्रामपंचायतीमधील भडवळवाडी (ता.कर्जत, जि.रायगड) येथे पाणीपुरवठा करणारी एक विहीर कोसळली असून दुसरी विहीर कोरडी पडली असल्याचे दिनांक २६ मार्च, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने लाखो रुपये खर्च करून पाणीपुरवठा योजना राबविली असतानाही सध्या या भागात भीषण पाणी टंचाई निर्माण झाल्याने येथील आदिवासींनी दिनांक २७ मार्च, २०१९ रोजी वा त्यासुमारास हंडा मोर्चा काढला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर वाडीस पाणीपुरवठा कमी होत असल्याने दिनांक १० फेब्रुवारी, २०१९ पासून ग्रामपंचायतीमार्फत पर्यायी व्यवस्था करण्यात आली असून वाडीस दामत-भडवल नळ पाणी पुरवठा योजनेतून पाईप लाईन टाकलेली असूनही मार्च, २०१९ पर्यंत या पाईप लाईनमधून पाणी पुरवठा होत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त वाडीतील पाणी टंचाई कायमस्वरुपी दूर करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

आदिवासींनी हंडा मोर्चा काढला होता, हे खरे नाही.

(३) हे खरे आहे.

(४) कर्जत तालुक्यात दामत-भडवळ ग्रुप ग्रामपंचातीमधील भडवळवाडीमध्ये एकूण दोन विहिरी असून एक विहीर पूर्णपणे ढासळलेली असून एक विहीर पूर्णपणे कोरडी झाली आहे. सदर वाडीस दामत-भडवळ नळ पाणी पुरवठा योजनेतून मार्च, २०१९ पर्यंत पाणी पुरवठा होत नव्हता. तथापि, दामत-भडवळ येथील नळ पाणी पुरवठा योजनेची भडवळवाडीसाठी टाकण्यात आलेली पाईप लाईन दुरुस्त करुन भडवळवाडीस पाणी पुरवठा सुरु करण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## तारापूर, बोईसर व पालघर (जि.पालघर) येथील प्रदूषण करणाऱ्या कारखान्यांवर कारवाई करण्याबाबत

**(४६) * १३४८८८ श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा),**

**डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.मनोहर भोईर (उरण), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमित घोडा (पालघर), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.पास्कल धनारे (डहाणू), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तारापूर, बोईसर, पालघर येथील औद्योगिक क्षेत्रात (जि.पालघर) महाराष्ट्र प्रदूषण महामंडळाची परवानगी घेऊन सूरु असलेले एकूण १०३५ कारखाने असून, २०० कारखाने बेकायदा सुरु आहेत, त्यातील काही कारखान्यांमध्ये विनापरवाना रासायनिक प्रक्रिया करण्यात येत असणे, औद्योगिक क्षेत्रातील सुरु असलेल्या कारखान्यांना सांडपाणी प्रक्रिया केंद्र बसवणे शासनाने बंधनकारक केले आहे, परंतु असे केंद्र उभारणे खर्चिक असल्याने अनेक कारखाने त्याची अंमलबजावणी न करता रात्रीच्या वेळेस सांडपाण्यावर कोणत्याही प्रकारची प्रक्रिया न करताच मुख्य नाल्यात सोडत असून अनेक कंपन्या रात्रीच्या वेळी केमिकलचा धूर सोडून मोठया प्रमाणात वायु प्रदूषण निर्माण करतात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हवेत सोडण्यात आलेल्या रासायनिक घटकांमध्ये प्रदूषणाचे प्रमाण जास्त असल्यामुळे परिसरातील लोकांच्या डोळयांची जळजळ होणे, ताप, मलेरिया, डोकेदुखी, उलटी तसेच श्वसनाचे विकार जडले असून हार्टॲटक, कॅन्सर, दमा, त्वचारोग इत्यादी आजारात वाढ झाल्याने याबाबत स्थानिक रहिवाशांनी अनेकदा संबधित पर्यावरण अधिका-यांकडे व कंपन्याकडे तक्रार केली आहे, कंपन्यांच्या परिसरात एखादा अपघात घडला तर जिवित व वित्त हानी होण्याची शक्यता आहे कारण बहुसंख्य कंपन्यांनी सभोवताली ॲम्ब्युलन्स व फायर ब्रिगेडच्या गाडया फिरविण्याकरिता जागा शिल्लक ठेवलेली नसुन कंपनीमध्ये बॉयलर रियाक्टरची तपासणीही वेळोवेळी करीत नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तारापूर एमआयडीसीमध्ये प्रदूषित रासायनिक सांडपाण्यामुळे खाडी किना-यावर मोठया प्रमाणात मासे व चिमण्यांचा मृत्यु झाला असून विषारी वायुमुळे कामगारांचे आरोग्यही धोक्यात आले असल्याने या परिसरात

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून रात्रीच्या वेळी गस्त घालण्यासाठी अधिका-यांचे पथक नियुक्त करण्यात येणार असल्याचे माहे जानेवारी, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय.

(४) असल्यास, स्थानिकांनी दिलेल्या तक्रारीबाबत चौकशी करुन संबंधित नागरीकांच्या आरोग्याशी खेळणा-या कंपन्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे अंशत: खरे आहे.

(४) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत दोषी आढळणाऱ्या कारखान्यांवर जल (प्रदूषण नियंत्रण व नियमण) कायदा १९७४ व हवा (प्रदूषण नियंत्रण व नियमण) कायदा १९८१ घातक घन कचरा व इतर कचरा अधिनियम २०१६ अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात अन्न व औषध प्रशासनाने भेसळयुक्त खाद्‌यपदार्थाचा साठा जप्त केल्याबाबत

**(४७) * १३८९८१ श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अन्न व औषध प्रशासनाने दिवाळीच्या पार्श्वभूमीवर माहे ऑक्टोंबर-नोव्हेंबर, २०१८ च्या दरम्यान राबविलेल्या विशेष मोहिमेत अनेक ठिकाणी छापे घालून सुमारे ४ कोटी रुपये किंमतीचा निकृष्ट दर्जाचा भेसळयुक्त खाद्‌यपदार्थांचा साठा जप्त केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पालघर जिल्ह्यात अशा प्रकारची किती प्रकरणे निदर्शनास आली, त्यापैकी किती प्रकरणांत कोर्टात खटले दाखल करण्यात आले आहेत व किती लोकांवार कारवाई करण्यात आली आहे,
(३) असल्यास, शासनाने या प्रकरणाची चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार खाद्यपदार्थात भेसळ करणा-या पालघर, मुंबई व राज्यातील इतर जिल्ह्यांतील दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल :** (१) राज्यभरात सन २०१८-१९ मध्ये सणासुदीच्या काळामध्ये राबविलेल्या विशेष मोहीमेमध्ये सुमारे ०५ कोटी २६ लाख इतक्या किंमतीचा अन्न पदार्थाचा साठा जप्त करण्यात आला आहे.
(२) व (३) पालघर जिल्ह्यात सन २०१८ च्या दिवाळी मोहिमे दरम्यान ३१ अन्न नमुने विश्लेषणासाठी घेऊन रुपये १५,२०,२३२/- किंमतीचा साठा जप्त करण्यात आला आहे. त्यापैकी ०७ नमुने मिथ्याछाप आढळल्याने सदर प्रकरणी न्यायनिर्णय खटले दाखल करण्यात आले आहेत.

राज्यात दि.०१.०८.२०१८ ते ३१.१२.२०१८ कालावधीमध्ये राबविण्यात आलेल्या सणासुदीच्या मोहिमेत सुमारे ७,४०,०७७.३ किलो वजनाचा सुमारे ५,२५,१६,२१६.४ रुपये किंमतीचा विविध अन्न पदार्थाचा साठा जप्त करण्यात आला आहे. सदर प्रकरणी अन्न पदार्थांचे १९८६ नमुने विश्लेषणासाठी घेण्यात आले होते. त्यौपैकी १४६५ नमुने मानदा प्रमाणे, १७४ नमुने कमी दर्जाचे, ४३ नमुने मिथ्याछाप, व ०६ असुरक्षित घोषित झाले आहेत. कमी दर्जाच्या व मिथ्याछाप नमुन्याप्रकरणी एकूण ५० न्यायनिर्णय खटले दाखल करण्यात आले आहेत. त्यापैकी १६ प्रकरणी एकूण २,८३,०००/- एवढा द्रव्यदंड ठोठावण्यात आला आहे. तसेच २२ प्रकरणी रुपये १,०९,०००/- इतका तडजोड दंड वसुल करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## विद्यापीठ अनुदान आयोगाने मुंबई विद्यापीठाच्या आयडॉलची मान्यता नाकारल्याबाबत

**(४८) * १३४८८६ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विद्यापीठ अनुदान आयोगाच्या नियमानुसार मुक्त दूर शिक्षण अभ्यासक्रम चालविणाऱ्या विद्यापीठाकडे राष्ट्रीय श्रेयांकन आणि मूल्यमापन परिषदेची (नॅक) श्रेणी असणे आवश्यक आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, मुंबई विद्यापीठाकडे नॅकची श्रेणी नसतानाही मुक्त व दूरशिक्षण केंद्र (आयडॉल) सुरु करुन त्यामध्ये ३० हजार विद्यार्थ्यांना प्रवेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विद्यापीठ अनुदान आयोगाने माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान झालेल्या बैठकीत मुंबई विद्यापीठाच्या आयडॉलला मान्यता न देण्याचा निर्णय घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच, विद्यापीठ अनुदान आयोगाने मान्यता असलेल्या अभ्यासक्रमांच्या याद्या मागील वर्षभरात चार वेळा प्रसिध्द केल्या असून कोणत्याही यादीत आयडॉलचा समावेश नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,चौकशीत काय आढळून आले आहे व त्यानुसार याप्रकरणी संबंधितांवर कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

विद्यापीठ अनुदान आयोगाने जून, २०१७ मध्ये दुरस्थ शिक्षणासाठी नविन नियमावली लागु केली होती. त्यानुसार मुक्त दूर शिक्षण अभ्यासक्रम चालविणाऱ्या विद्यापीठाकडे राष्ट्रीय श्रेयांकन आणि मूल्यमापन परिषदेची

(नॅक) श्रेणी असणे आवश्यक होते. तथापी विद्यापीठ अनुदान आयोगाने दि. ०६ सप्टेंबर, २०१८ रोजी आपल्या परिपत्रकामध्ये तिसरी दुरुस्ती करुन नॅक ची मुदत सन २०२० पर्यंत वाढविली आहे.

(३) हे खरे नाही.

(४) होय, हे खरे आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## काल्हेर (ता.भिवंडी, जि.ठाणे) येथील कारखान्यात बनावट अगरबत्तीचे उत्पादन करुन विक्री होत असल्याबाबत

**(४९) * १३८२१२ डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) काल्हेर (ता.भिवंडी, जि.ठाणे) येथील कारखान्यात अगरबत्तीसाठी लागणारा कच्चा माल चीन मधून आयात करुन तो विविध सुगंधी रासायनीक द्रव्यांत मिसळुन प्रसिध्द ब्रँडची अगरबती म्हणून त्याची विक्री होत असल्याचे माहे मार्च, २०१९ च्या तिसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ठाणे कृषी अधिकारी व घरगुती कीटकनाशक नियंत्रण संघाच्या अधिकाऱ्यांनी काल्हेर येथील "डिवाईन प्रग्नेसीस" या कारखान्यावर दिनांक १५ मार्च, २०१९ रोजी वा त्यासुमारास छापा टाकून लाखो रुपयांचा मुद्देमाल जप्त केला, हे ही खरे आहे काय,.

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) तसेच भविष्यात असे प्रकार होऊ नयेत म्हणून शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. अनिल बोंडे :** (१) होम इन्सेक्ट कंट्रोल असोसिएशन यांचेकडून तक्रार प्राप्त झालेली आहे.

(२) यासंदर्भात, होम इन्सेक्ट कंट्रोल असोसिएशनने आयुक्त (कृषि) यांच्याकडे केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने, कृषि विभाग व होम इन्सेक्ट कंट्रोल असोसिएशनचे प्रतिनिधी यांच्या संयुक्त पथकाने दिनांक १२/०३/२०१९ रोजी डिवाईन फ्रॅग्नस, काल्हेर, भिवंडी, जि.ठाणे येथील कंपनीवर गोपनीय पध्दतीने छापा टाकून साठवण व उत्पादन स्थळाची तपासणी केली. सदर ठिकाणी १५ प्रकारच्या Incense Stick ची पाकीटे मिळून आली. सर्व साठयामधून किटकनाशके कायदा १९६८ व किटकनाशक नियम १९७१ नुसार नमुने काढणेत आले. सदरचे नमुने Analytical Chemist Pesticide Residue Testing laboratory, Pune यांचेकडे तपासणी करीता पाठविले. सदर १५ नमुन्यांचे तपासणी अहवाल प्राप्त झाले असून संबंधित उत्पादनामध्ये किटकनाशकाचा अंश व रासायनिक द्रव्ये आढळले नाही. त्यामुळे मुद्देमाल जप्त करण्यात आलेला नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) अशा प्रकरणी सद्य:स्थितीत अस्तित्वात असलेल्या किटकनाशके कायदा १९६८ व किटकनाशक नियम १९७१ मधील तरतूदीनुसार संबंधितांवर कारवाई करण्यात येते.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पनवेल (ता.पनवेल, जि.रायगड) शहरी व ग्रामीण भागात बंद बाटलीचे भेसळयुक्त पाणी विकून नागरिकांची होत असलेली फसवणूक

**(५०) * १३४९४६ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अस्लम शेख (मालाड**

**पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.राहुल बोंद्रे (चिखली) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल (ता.पनवेल, जि.रायगड), बुलढाणा, मोताळा (जि.बुलढाणा) तालुका तसेच पुणे शहर आणि परिसरात अन्न व औषध प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे तसेच विभागाला बंद बॉटल पाणी अथवा आर.ओ. पाण्याचे परवाने देण्याचे कोणतेही अधिकार नसल्याने मिनरल वाटरच्या माध्यमातून छोटया-मोठया व्यावसायिक व व्यापा-यांकडून विविध कंपन्यांच्या नावाखाली दररोज हजारो लिटर बंद बाटलीत भेसळयुक्त पाणी विकून नागरिकांची फसवणूक केली जात असल्याचे दिनांक २९ एप्रिल, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या दुषित पाण्यामुळे नागरीकांच्या आरोग्याला तसेच विविध कंपन्यांमार्फत बंद बाटलीच्या पाण्यासाठी वापरण्यात येणा-या प्लस्टिकच्या बाटल्यांमुळे पर्यावरणालाही धोका निर्माण होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून बंद बाटलीतील पाणी व आर.ओ.च्या पाण्याची गुणवत्ता प्रमाणित करण्याच्या अनुषंगाने तसेच नागरिकांची फसवणूक करुन आरोग्याला व पर्यावरणाला धोका निर्माण करणाऱ्या कंपन्यांवर कारवाई करण्यास विलंब करणा-या संबंधित विभागाच्या अधिका-यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल :** (१) हे खरे नाही. अशी बाब अन्न व औषध प्रशासनाच्या निदर्शनास आलेली नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कोकणासाठी स्वतंत्र शैक्षणिक विदयापीठ स्थापन करण्याबाबत

**(५१) * १३५६७५ श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.राजन साळवी (राजापूर), श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोकणासाठी स्वतंत्र शैक्षणिक विदयापीठ स्थापन करण्याची मागणी सन २०१२ पासून सातत्याने स्थानिक लोकप्रतिनिधी, विविध शिक्षणप्रेमी व शिक्षण संस्था. शासनाकडे करित आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्वतंत्र कोकण विदयापीठासाठी रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्हयातील ८३ महाविदयालयांनी पाठिंबा दर्शविला असल्याचे तसेच विद्यापीठ स्थापन करण्याच्या मागणीवर स्वतंत्रपणे बैठक घेण्याचे आश्वासन मा.शिक्षण मंत्री यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशन २०१८ मध्ये वा त्यादरम्यान देऊनही अद्यापी आश्वासनाची पूर्तता झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कोकणासाठी स्वतंत्र विद्यापीठ स्थापन करण्याबाबतची सद्यस्थिती काय आहे ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

विधानमंडळाच्या, हिवाळी अधिवेशन २०१८ मध्ये ॲड निरंजन डावखरे व श्री.नागोराव गाणार, विधानपरिषद सदस्य यांनी, कोकणासाठी स्वतंत्र विद्यापीठ स्थापन करण्यात यावे. यासाठी लक्षवेधी सूचना क्रमांक ३९२ मांडण्यात आली होती. या लक्षवेधी सूचनेच्या अनुषंगाने अध्यक्ष, विधानपरिषद यांनी संबंधित विधानपरिषद सदस्य यांची कोकणासाठी स्वतंत्र विद्यापीठ स्थापनेसाठी बैठक आयोजित करण्यात येईल असे आश्वासन दिले होते या अनुषंगाने बैठक घेण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

(३) रत्नागिरी येथे उपकेंद्र सुरु करण्यात आले असून, प्रशासकीय सोयी सुविधा, नाव नोंदणी, पात्रता, स्थलांतर, प्रमाणपत्र प्रक्रिया, उत्तरपत्रिकांचे

मुल्यांकन करण्याकरिता प्रत्येक जिल्हयांच्या प्रमुख महाविद्यालयांमध्ये केंद्रीय मुल्यांकन केंद्रे स्थापन करण्यात आली आहे इत्यादी सेवा उपलब्ध करुन दिल्या जातात.

-----------------

## मुंबईतील शिक्षकांना शिक्षण निरिक्षक कार्यालयाने सेवासमाप्तीच्या नोटीसा पाठविल्याबाबत

**(५२) * १३५०६८ श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्री.संजय कदम (दापोली), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.दिलीप सोपल (बार्शी), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.प्रदीप नाईक (किनवट), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.सुनिल केदार (सावनेर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), अॅड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.संजय सावकारे**

**(भुसावळ), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील ३५० शिक्षकांना त्यांच्या सेवासमाप्तीच्या नोटीसा शिक्षण निरिक्षक कार्यालयाकडून दिनांक ३० मार्च, २०१९ रोजी वा त्यासुमारास पाठविण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या शिक्षकांच्या सेवा अचानक समाप्त करण्याची कारणे काय आहेत तसेच उक्त ३५० शिक्षकांच्या सेवासमाप्तीमुळे ते बेरोजगार होणार आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, मुंबईत दिनांक २ मे २०१२ रोजी नंतरची वाढीव पदे व रिक्त पदांवरील नियुक्त शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचा-यांना कायम करण्याची शिफारस शिक्षण आयुक्तांनी शिक्षण सचिवांना केली असून सदर शिक्षकांबाबत एका सामाजिक संस्थेने शिक्षण आयुक्तांकडे या शिक्षकांच्या नियुक्त्या शासन निर्णयाप्रमाणे करण्यात आल्या असल्याने त्यांच्या सेवा समाप्त करण्यात येऊ नये, अशी मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आशिष शेलार :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) एकूण ९३ शिक्षकांच्या मान्यता रद्द करण्यात आलेल्या आहेत. त्यापैकी ५३ शिक्षकांच्या मान्यता वाढीव तुकडयांवरील आहेत. अन्य ४० शिक्षकांच्या मान्यता अनुशेष पालन न करणे, विहीत कार्यपध्दतीचा अवलंब न करणे इ. कारणांमुळे रद्द करण्यात आलेल्या आहेत.

(३) हे खरे आहे.

(४) सदर प्रकरणी त्रुटींची पूर्तता करुन स्वयंस्पष्ट प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना आयुक्त शिक्षण यांना देण्यात आल्या आहेत

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अकोला जिल्हयात स्वच्छ व शुध्द पाण्याचा पुरवठा करण्याबाबत

**(५३) * १३७६२३ श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्हा परिषद अंतर्गत आरोग्य विभागाने या वर्षी (सन २०१८-१९) केलेल्या मान्सूनपूर्व सर्व्हेक्षणात जिल्हयातील २९ जलस्त्रोत तीव्र जोखीम ग्रस्त आढळून आली असल्याने त्यांना लाल कार्ड देण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच पाणीपुरवठा करणाऱ्या योजनांमध्ये अशुद्ध पाणीपुरवठा करणे, स्त्रोतांचा परिसर अस्वच्छ, गळक्या जलवाहिन्या तसेच जलजन्य आजारांचा होत असलेला प्रसार इत्यादी कारणांसाठी १७४ ग्रामपंचायतींना पिवळे कार्ड देण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार अकोला येथील नागरीकांना स्वच्छ व शुध्द पाणीपुरवठा होण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) व (२) सन २०१८-१९ मध्ये केलेल्या मान्सून पुर्व सर्वेक्षणात अकोला जिल्हयातील २५ जलस्त्रोत तीव्र जोखीमग्रस्त आढळून आले असून एका ग्राम पंचायतीला लाल कार्ड व १९४ ग्रामपंचायतींना पिवळे कार्ड देण्यात आले आहे.

(३) नागरिकांना स्वच्छ व शुध्द पाणी पुरवठा उपलब्ध व्हावा म्हणून होणारा पाणी पुरवठा आरोग्य दृष्ट्या गुणात्मक निर्जंतूकीकरण साथरोग मुक्त आहे किंवा कसे याचा पाठपुरावा करण्यात येतो. तसेच, जलसुरक्षकामार्फत पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतांचे पाणी नमुने घेवून जिल्हा आरोग्य प्रयोगशाळेत तपासणीकरिता पाठविण्यात येतात. त्यामध्ये दुषित झालेल्या स्त्रोतांचे योग्य दर्जाची ब्लिचींग पावडर व्दारे निर्जंतुकीकरण करण्यात येते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील विद्यापीठांमध्ये पदनाम व वेतनश्रेणीत गैरव्यवहार झाला असल्याबाबत

**(५४) * १३५६३६ श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, कवियित्री बहिणाबाई चौधरी उत्त्तर महाराष्ट्र विद्यापीठ (जळगांव), संत गाडगेबाबा विद्यापीठ (अमरावती), डॉ.बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठ (औरंगाबाद), शिवाजी विद्यापीठ (कोल्हापूर) आणि गोंडवाना विद्यापीठ (गडचिरोली) या विद्यापीठांमध्ये शासनाने मंजूर केलेल्या आकृतीबंधानुसार कोणत्याही विद्यापीठात अ, ब, क, ड या श्रेणीत नसलेली पदे भरण्यात आली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विद्यापीठांनी शासनाच्या आकृतीबंधानुसार पदे न भरल्याने पदनाम व वेतनश्रेणीत गैरव्यवहार झाला असल्याचे निष्पन्न झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाच्या मंजूर आकृतीबंधानुसार पदे भरण्याऐवजी नियमबाह्य पध्दतीने भरलेल्या पदांची वाढवून देण्यात आलेली वेतनश्रेणी शासनाने रद्द केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार सदर वाढीव श्रेणीची वसूली करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच सद्यःस्थिती काय आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१), (२), (३) व (४) हे खरे नाही.

तथापि, शासन निर्णय दि. ०६.०७.२००९ अन्वये राज्यातील अकृषि विद्यापीठातील शिक्षकेतर पदांचा गटनिहाय (अ, ब, क, ड) सुधारित आकृतीबंध निश्चित करण्यात आला. त्यानुसार पदनिहाय आकृतीबंधाचा प्रस्ताव शासनास सादर करण्याच्या सूचना विद्यापीठांना देण्यात आल्या. प्रश्नात नमूद विद्यापीठानी काही पदांच्या पदनामात व वेतनश्रेणीमध्ये बदल

करून प्रस्ताव शासनास सादर केले. विद्यापीठांनी सादर केलेल्या प्रस्तावानुसार पदनिहाय सुधारित आकृतीबंधास शासन मान्यता देण्यात आली. त्यामुळे मुळ पदावर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या कर्तव्ये व जबाबदाऱ्यामध्ये बदल न होता केवळ त्यांच्या पदनामात व वेतनश्रेणीमध्ये बदल झाला. तसेच शासनस्तरावरून पदनिहाय आकृतीबंधास मान्यता देण्याबाबतची कार्यवाही करताना विहित कार्यपध्दतीचा व वित्तीय नियमांचा भंग झाल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे उक्त नमूद विद्यापीठांच्या बाबतीत निर्गमित केलेले शासन निर्णय शासनाने दि. १७.१२.२०१८ च्या शासन निर्णयान्वये रद्द करून सदर पदांच्या वेतनश्रेण्या पूर्ववत करणे, अतिप्रदान झालेल्या रकमेची परिगणना करणे, निवृत्ती वेतन पुन:निर्धारित करणे इ. कार्यवाही करण्यासाठी संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य यांच्या अधिनस्त "विशेष पथक" गठित केले आहे.

सदर शासन निर्णयास आव्हान देणाऱ्या अनेक याचिका मा.उच्च न्यायालयाच्या विविध खंडपीठात दाखल झालेल्या आहेत. मा.न्यायालयास विनंती करून सदरहू सर्व याचिका मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे सुनावणीसाठी एकत्रित करण्यात आलेल्या आहेत. दरम्यान मा. उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ येथे या विषयाबाबत दाखल असलेली याचिका क्र. १२१८/२०१९ मध्ये मा.उच्च न्यायालयाने दि.२९.०१.२०१९ च्या आदेशान्वये संबंधित कर्मचाऱ्यांना अतिप्रदान झालेल्या रकमेची वसुली करण्यास स्थगिती दिलेली असून सद्य:स्थितीत प्रकरण मा. उच्च न्यायालयात न्यायप्रविष्ठ आहे.

-----------------

## पन्हाळा (जि.कोल्हापूर) किल्ल्याच्या तटबंदीला धोका निर्माण झाल्याबाबत

**(५५) * १३६३७५ श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पन्हाळा (जि.कोल्हापूर) किल्ल्याच्या अंधारबाव तटबंदीखालील शंभर फूट उतारावर खोदकाम झाल्याने कडयाचा उतार ढासळून तटबंदीला धोका निर्माण झाल्याचे माहे फेब्रुवारी, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात शासनामार्फत पाहणी करण्यात आली आहे काय, सदर पाहणीचे निष्कर्ष काय आहेत व तद्नुसार गडकिल्ल्यांचे अस्तित्व राखण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यांत येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.

सदरचा किल्ला हा भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण मंडळाच्या अखत्यारितील आहे.

अशी कोणतीही बाब त्यांच्या निदर्शनास आली नसल्याचे त्यांनी कळविले आहे.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नांदगांव, विठ्ठलवाडी (ता.कर्जत, जि.रायगड) येथील दलित व आदिवासी कुंटुबांना नियमित धान्य पुरवठा करण्याबाबत

**(५६) * १३५८७७ श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदगांव, विठ्ठलवाडी (ता.कर्जत, जि.रायगड) येथील दलित व आदिवासी कुंटुबाना मागील वर्षभरापासून नियमित धान्य पुरवठा होत नसल्याने या विरोधात दिनांक ७ मार्च, २०१९ रोजी वा त्यासुमारास तहसिल कार्यालयात पुरवठा विभागाच्या अधिका-यांना घेराव घातला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सदर दलित व आदिवासी कुटुंबाना नियमित धान्य पुरवठा होण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर :** (१) होय.

दिनांक ५.०३.२०१९ रोजी काही महिलांनी तक्रार दाखल केली आहे.

(२) व (३) मौजे नांदगाव (विठ्ठलवाडी), ता.कर्जत, जि.रायगड येथील रास्तभाव दुकानदाराने सदर लाभार्थ्यांच्या RCMS प्रणालीमध्ये नोंदी घेतल्या नसल्याने त्या दुकानदाराचा परवाना निलंबित करण्यात आला.

तद्नंतर, सदर आदिवासी कुटुंबातील शिधापत्रिकाधारकांच्या RCMS प्रणालीमध्ये नोंदी करुन घेण्यात आल्या असून त्यांना माहे मार्च, २०१९ पासून सवलतीच्या दराने अन्नधान्याचा लाभ नियमितपणे देण्यात येत आहे.

-----------------

## कळणे (ता.दोडामार्ग, जि.सिंधुदुर्ग) येथील नुतन महाविद्यालयात वेतनापोटी मिळणाऱ्या निधीचा अपहार केल्याबाबत

**(५७) * १३८६२५ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळणे (ता.दोडामार्ग, जि.सिंधुदुर्ग) येथील नुतन महाविद्यालयात एक अतिरिक्त शिक्षक असताना सन २०१५ पासून ते अद्यापपर्यंत सिंधुदुर्ग माध्यमिक शिक्षण अधिकारी व वेतनपथक अधिक्षिका यानी शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची कागदोपत्री नोंद दाखवून वेतनापोटी मिळणाऱ्या सुमारे ५० लाख रुपयांच्या निधीमध्ये आर्थिक गैरव्यवहार केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात उक्त दोषी शिक्षण अधिकारी व अधिक्षिका यांचेविरुध्द लेखी तक्रार केली म्हणून श्री धारेश्वर माध्यमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका आणि सात अधिकाऱ्यांनी गुडांकरवी जीवघेणा हल्ला करण्यात आला असून शासनानेही महाविद्यालयाची अनुदानाची थकित असलेली सन २००५ पासून ते अद्यापपर्यंतची १ कोटी रुपयांची रक्कम अद्यापही शाळेस उपलब्ध करुन दिली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय त्यात काय आढळून आले व त्यानूसार दोषींविरुध्द कोणती कारवाई केली तसेच संस्थेची थकित अनुदानाची रक्कम त्वरीत उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आशिष शेलार :** (१) नाही.
(२) नाही, वेतनेत्तर अनुदान सन २००४-०५ ते सन २०१२-१३ पर्यंतची वेतनेत्तर अनुदानाची कोणतीही थकित देय नाही. सन २०१३-१४ पासूनची वेतनेत्तर अनुदान मागणी अद्याप करण्यात आलेले नाही.
(३) व (४) नूतन महाविद्यालय कळणे ता.दोडामार्ग जि.सिंधुदुर्ग या संस्थेने केलेला गैरकारभार, बोगस समायोजन व आर्थिक भ्रष्टाचाराबाबत प्राथमिक चौकशी करण्याकरिता शिक्षणाधिकारी (माध्य.) जि.प. औरंगाबाद यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

-----------------

## वडाळा (मुंबई) येथे भेसळयुक्त आईसस्क्रीम बनविणा-या कंपनीवर कारवाई करण्याबाबत

**(५८) * १३७२९५ श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दक्षिण मुंबईतील वडाळा परिसरातील साईनाथ इंडस्ट्रीमधील भारत इंडस्ट्रीयल इस्टेट या कंपनीवर अन्न व औषध प्रशासनाने दिनांक १७ एप्रिल, २०१९ रोजी वा त्यासुमारास धाड टाकून वनस्पती तेलापासून बनविलेला आईक्रिमचा २७ हजार ५८६ रुपयांचा साठा जप्त करुन सर्व नमुने प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठविले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आरोग्यास अपायकारक असलेल्या वनस्पती तेलयुक्त आईसक्रिम बनविणाऱ्या या कंपन्यांवर शासनाने कोणती कारवाई केली तसेच सदर धाडीमध्ये किती आरोपींना अटक करण्यात आली तसेच त्यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल :** (१) होय.
(२) अन्न सुरक्षा व मानदे कायद्यामधील तरतुदींचे उल्लंघन केल्याने सदर पेढीस व्यवसाय बंद करण्याबाबत नोटीस बजावलेली आहे. तसेच अन्न पदार्थाचा उर्वरीत एकूण रु.२७८५६/- किंमतीचा साठा जप्त करण्यात आला आहे. नमुन्यांचे विश्लेषण अहवाल मागविण्यात आले असून त्यानुसार पुढील कायदेशीर कारवाई करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील काही संस्था आणि मुख्याध्यापक समायोजित अतिरिक्त शिक्षकांना शाळेत रुजू करून घेण्यास टाळाटाळ करत असल्याबाबत

**(५९) * १३५६३२ श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यभरात विविध ठिकाणच्या संस्था आणि मुख्याध्यापक, समायोजित अतिरिक्त शिक्षकांना शाळेत रुजू करून घेण्याबाबत टाळाटाळ करत असल्याचे माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, समायोजनाच्या या प्रक्रियेत अडथळा निर्माण करणाऱ्या शिक्षक आणि संस्थांवर कारवाई करण्याचा निर्णय विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभागाने घेतला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यभरात समायोजित अतिरिक्त शिक्षकांना शाळेत रुजू करून घेण्याबाबत टाळाटाळ करणाऱ्या अशा किती संस्था आहेत,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार उक्त संस्थांवर कारवाई करून त्यांची मान्यता रद्द करणार आहे काय, एकूण किती संस्थांवर कारवाई करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे आहेत ?

**ॲड. आशिष शेलार :** (१) हे खरे नाही.

(२) शालेय शिक्षण विभागाच्या शासन निर्णय दिनांक ०४.१०.२०१७ नुसार कार्यवाही सुरु आहे.

(३) व (४) नांदेड (१०), सिंधुदूर्ग (५), धुळे (९), यवतमाळ (२१) या जिल्हयातील शाळांमधील (४५) पदे व्यपगत करुन संचमान्यतेमध्ये कमी करण्यात आलेली आहेत. उर्वरित जिल्हयातील शाळांमधील पदे व्यपगत करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील तंत्रनिकेतन महाविद्यालयांची संख्या कमी झाल्याबाबत

**(६०) * १३४९०१ ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.नरेंद्र महेता (मिरा भाईंदर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.संजय केळकर (ठाणे), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.दिपक चव्हाण (फलटण), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्री.संजय कदम (दापोली), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.मकरंद**

**जाधव-पाटील (वाई), श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.दिलीप सोपल (बार्शी), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.प्रदीप नाईक (किनवट), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.नारायण पाटील (करमाळा), श्री.राजु तोडसाम (अर्णी), श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील दहावीनंतर तंत्रनिकेतन पदविका अभ्यासक्रमांच्या जागा महाविद्यालयात मोठ्या प्रमाणात रिक्त असल्याने नागपूर येथील ८, नाशिक ५, पुणे ५, औरंगाबाद ४, मुंबई ३ व अमरावती २ अशा एकूण २७ संस्थाचालकांनी महाविद्यालये बंद करण्याचे प्रस्ताव तंत्रशिक्षण संचालनालयाकडे दाखल केले असल्याचे माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्या दरम्यान निदशर्नास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तंत्रशिक्षण संचालनालयाने पदविका अभ्यासक्रमांच्या संस्थांचे स्थलांतर, संस्था बंद करणे, नवीन पदविका सुरु करणे यासाठी ऑनलाईन प्रस्ताव मागवले होते त्यावर सदर संस्थांनी संस्था बंद करण्यासाठीचे प्रस्ताव सादर केले असून यामुळे राज्यातील तंत्रनिकेतन पदविका अभ्यासक्रमांच्या पाच हजार जागा कमी होणार असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने उक्त तंत्रनिकेतन विद्यालये बंद करण्याची परवानगी दिलेली आहे काय, तसेच सदर महाविद्यालये बंद झाल्यानंतर तेथील विद्यार्थ्यांची कोणती पर्यायी व्यवस्था करण्यात आली वा येत आहे,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार उपरोक्त तंत्रनिकेतन कॉलेजच्या समस्या सोडवून सदर तंत्रनिकेतन महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची संख्या वाढविण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय.
(२) होय.
(३) नाही, शैक्षणिक वर्ष २०१९-२० करीता कोणत्याही संस्थेस संस्था बंद करण्यास अद्याप शासन मान्यता देण्यात आलेली नाही. तसेच संस्थांनी टप्प्याटप्प्याने संस्था बंद करण्याचा प्रस्ताव सादर केला असल्याने संस्थेत शिकत असलेल्या नियमित विद्यार्थ्यांची पर्यायी व्यवस्था करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(४) तंत्रनिकेतन महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची संख्या वाढविण्यासाठी शासनाकडून खालील प्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली आहे.

१) तंत्रनिकेतनातील विद्यार्थ्यांचे प्रवेश वाढविण्याच्या दृष्टीने सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय व संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांच्याकडून एकत्रितपणे विभागवार कार्यशाळा आयोजित करुन विद्यार्थ्यांचे व पालकांचे समुपदेशन करण्यात येत आहे.

२) तंत्रनिकेतन प्रवेशासाठी माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमध्ये शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांमध्ये जागृती घडविण्यासाठी कार्यशाळा आयोजित करण्याबाबत आवश्यक ते निदेश राज्यातील शिक्षणांधिकाऱ्यांना देण्याबाबत शालेय शिक्षण व क्रीडा विभागास दि.२५/०३/२०१९ च्या पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे. त्यानुषंगाने शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने त्याबाबत योग्य ती कार्यवाही करण्याबाबतचे आदेश त्यांचे दिनांक १५/०५/२०१९ चे पत्रान्वये संबंधीतांना दिलेले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## गोरेगाव(प) येथील विद्यामंदिर ही शाळा बंद करण्यात येत असल्याबाबत

**(६१) * १३८४७४ श्री.राज पुरोहित (कुलाबा), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोरेगाव (प.) मुंबई येथील विद्यामंदिर ही शाळा धोकादायक आणि मोडकळीस आल्याच्या नावाखाली बंद करण्यात येत असल्याचे माहे मे, २०१९ मध्ये वा मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या शाळेत १ ली ते १० वी पर्यंत ३५० मुले शिक्षण घेत असून त्यांचे शैक्षणिक भवितव्य धोक्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू शाळा बंद करण्यास पालक व विद्यार्थ्यांचा विरोध आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार सदरहू शाळा सुरू ठेवण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आशिष शेलार :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## खामगावकडून नागपूरकडे गुटखा वाहून नेणारा ट्रक पकडल्याबाबत

**(६२) * १३८५०२ श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खामगावकडून नागपूरकडे शंभर गोण्या प्रतिबंधित गुटखा वाहून नेणारा ट्रक जिल्हा पोलीस अधिक्षक यांच्या विशेष पथकासह अन्न व औषध विभागाने संयुक्त कारवाई करत पकडला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कारवाईत सुमारे १२ लाख रुपयांचा गुटखा आणि २० लाख रुपयांचा ट्रक असा एकूण ३२ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केल्याचे माहे मे, २०१९ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर ट्रक चालक व क्लिनर यांना अटक करुन त्यांची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानूसार शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल :** (१) होय.
(२) होय.
(३) सदर प्रकरणी वाहनाचा चालक, वाहना समवेतचा क्लिनर सदर प्रतिबंधित पदार्थाचा खरेदीदार यांच्याविरुध्द सिव्हिल लाईन पोलिस स्टेशन, अकोला येथे भारतीय दंड विधान संहिता व अन्न सुरक्षा व मानके कायदा, २००६ अंतर्गत प्रथम खबर अहवाल नोंदिविला असून क्र.२२३/२०१९ असा आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## गोंडवाना विद्यापीठ (जि.गडचिरोली) येथील जमीन खरेदीत झालेला गैरव्यवहार

**(६३) * १३५३७५ डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गोंडवाना विद्यापीठ (जि.गडचिरोली) येथील जमीन खरेदी व्यवहारात ३ कोटी ७३ लाख रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचे माहे मे, २०१९ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे,
(२) असल्यास, सदर जमीन अडपल्ली येथे खरेदी करण्यात आली असून ओलीत जमीनीचे दर कोरडवाहु जमीनीला देण्यात येऊन चौकशी समितीने कुलगुरुंना दिनांक २९ एप्रिल, २०१९ रोजी वा त्यासुमारास सादर केलेल्या

अहवालात जमीन खरेदीच्या ९ व्यवहारात कोट्यवधी रुपयांची तफावत असल्याचे निदर्शनास आणले आहे हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, उक्त विद्यापीठाने जमीन अधिग्रहीत करतांना प्राचार्य श्री.राजाभाऊ मुनघाटे यांना त्यांच्या जमिनी व त्यावरील इमारतीसाठी नियमबाहय ६१ लाख रूपये जास्तीचे देऊन लाखो रूपयांचा गैरव्यवहार केला असल्याचे दिनांक १५ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास निर्दशनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणाची सिनेट सदस्यांनी तक्रार करताच चौकशी करण्याअगोदर सदर प्रकरण बंद करण्यासाठी प्राचार्य श्री.राजाभाऊ मुनघाटे यांना जास्तीची दिलेली रक्कम भरण्यास सांगण्यात आली आहे, हे ही खरे आहे,

(५) असल्यास सदर प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.

उप जिल्हाधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, गडचिरोली यांच्या दि. २८.०५.२०१८ रोजीच्या पत्रान्वये सुधारीत प्राप्त मुल्यांकनानुसार खरेदीखत करण्यात आले आहे.

(२) होय, हे अंशतः खरे आहे.

विद्यापीठ स्तरावर नेमलेल्या चौकशी समितीने, विद्यापीठाच्या जमीन खरेदीच्या ९ व्यवहारात तफावत असल्याचे कुलगुरुंच्या निदर्शनास आणून देण्यात आले आहे. अडपल्ली येथे विद्यापीठासाठी खरेदी करण्यात आलेल्या जमिनीला ओलीत जमिनीचे दर कोरडवाहु जमिनीला देण्यात आले नाहीत.

(३), (४) व (५) होय, हे अंशतः खरे आहे.

सहायक जिल्हाधिकारी तथा विशेष भूसंपादन अधिकारी यांनी दि.२८.०५.२०१८ रोजीच्या पत्रान्वये सुधारीत मूल्याकनांनुसार श्री. राजाभाऊ मुनघाटे यांच्या जमिनीचे मुल्यांकन करुन रु.१,८३,१५,५५५/- इतकी रक्कम RTGS द्वारे अदा करण्यात आली होती.

तथापि सदर जमिनीचे फेरमुल्यांकन केले असता रु. १,२२,०१,६८०/- एवढी झाली त्यामुळे यापुर्वी अदा केलेले जादा रु.६१,१३,८७५/- इतकी रक्कम विद्यापीठाच्या खात्यात रक्कम जमा केली आहे.

अधिक्षक अभियंता यांना संबंधित दोषी अधिकाऱ्यांविरुध्द म.ना.से. (शिस्त व अपिल) अधिनियम १९७९ मधील तरतुदीनुसार शिस्तभंग व विभागीय चौकशीबाबतची कार्यवाही करण्याबाबतचे जिल्हाधिकारी, गडचिरोली यांनी निर्देश दिले आहेत.

-----------------

## अंबरनाथ व कुळगाव-बदलापूर नगर पालिका (जि.ठाणे) हद्दीतील नवीन पाणी कनेक्शन बंद केल्याने शासनाचे होत असलेले नुकसान

**(६४) * १३७५६७ श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.नरेंद्र महेता (मिरा भाईंदर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबरनाथ व कुळगाव-बदलापूर नगर पालिका (जि.ठाणे) हद्दीतील महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या लेखी आदेशाने माहे एप्रिल, २०१६ ते माहे मे, २०१८ पर्यंत नवीन पाणी कनेक्शन बंद करण्यात आल्याने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणानेच केलेल्या अनधिकृत नळ जोडण्यांच्या सर्व्हेनुसार महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे पर्यायाने शासनाचे सुमारे १२ कोटी रुपयांचे नुकसान झाल्याचे सन २०१९ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येथील महाराष्ट्र प्राधिकरण जल व्यवस्थापन विभागाने वरिष्ठांच्या आदेशानुसार कृत्रिम पाणी टंचाई निर्माण करून नागरिकांना वेठीस धरले असल्याचे माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती महाराष्ट्र जीवन प्राधिकरण पर्यायाने शासनाचे १२ कोटी रुपयांचे नुकसान

तसेच कृत्रिम पाणी टंचाई निर्माण करून नागरिकांना वेठीस धरणाऱ्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील नदीप्रदुषण कमी करण्याच्या हरित लवादाच्या आदेशावर कार्यवाही होणेबाबत

**(६५) * १३४८९१ श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.पंकज भुजबळ (नांदगाव),**

**श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्री.संजय कदम (दापोली), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.दिलीप सोपल (बार्शी), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.प्रदीप नाईक (किनवट), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.संजय केळकर (ठाणे), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्रीमती संगीता ठोंबरे (केज), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई उच्च न्यायालयाने काही महिन्यांपूर्वी मुंबईसह राज्यातील नदी प्रदूषणाच्या प्रश्नावरुन राज्यशासनाला निर्देश दिले असून केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अहवालानुसार राज्यातील प्रदूषित नद्यांची संख्या सर्वाधिक असून ३० पेक्षा अधिक जिल्ह्यांमधील ५३ नदया प्रदुषित असून १५२ ठिकाणी पाण्याचा दर्जा खालावलेला असल्याचे माहे फेब्रुवारी, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र हे देशातील सर्वाधिक प्रदुषित नदयांचे राज्य असून याबाबत राज्याच्या मुख्य सचिवांनी याप्रकरणी व्यक्तिश: पुढाकार घेऊन कालबध्द कार्यक्रमाद्वारे अमुलाग्र बदल घडवावा असे केंद्रीय हरित लवादाने आदेश दिल्याची बाब माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबई आणि परिसराला पाणीपुरवठा करणाऱ्या नद्या मुंबई, रायगड, रत्नागिरी, ठाणे आणि पालघर या जिल्ह्यातून वाहत असून भातसा नदीच्या काठावर शहापूर, भदाणे, आसनगाव, वाशिंद, खडवली ही शहरे असून या ठिकाणी सांडपाणी प्रक्रियेची कोणतीच उपाययोजना नसल्याने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने एप्रिल, २०१७ ते मार्च, २०१८ या कालावधीत केलेल्या सर्वेक्षणाचा अहवाल जानेवारी, २०१९ मध्ये जाहिर केला असून केलेल्या सर्वेक्षणानुसार गेल्या दहा वर्षात निर्देशांकांत वाढ होऊन तो अतिवाईट श्रेणीमध्ये गेला असल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(४) तसेच, राज्यातील ५३ नदीकिनाऱ्यावरील प्रदूषण कमी करण्यासाठी तात्काळ कृती आराखडा तयार करणे तसेच घनकचरा व्यवस्थापनाच्या नियमांचे पालन करण्याबाबतचा अहवाल दर चार महिन्यांनी सादर करण्याचे आदेश, राष्ट्रीय हरित लवादाच्या अध्यक्षांनी, प्रस्तूत केलेल्या अहवालाद्वारे दिनांक ९ एप्रिल, २०१९ रोजी दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, नदीकिनारी असलेली गावे व शहरांमध्ये सांडपाणी, पुनप्रक्रिया प्रकल्प निर्माण करण्याची आवश्यकता असून नाल्याच्या माध्यमातून सांडपाणी नदीमध्ये जाऊ नये यासाठी नाला स्वच्छतेची सोय करण्याच्या सूचना कृती आराखड्यात देण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,
(६) असल्यास, राज्यातील प्रदुषित नद्या कोणकोणत्या आहेत व त्या प्रदूषित होण्याची कारणे काय आहेत, सदरहू नद्यांच्या आसपास वास्तव्य करणाऱ्या व नदीच्या पाण्यावर अवलंबून असणाऱ्या नागरीकांच्या आरोग्याच्या सुरक्षेच्या दृष्टीने नद्यांचे पाणी प्रदुषित करणाऱ्यांवर काय कारवाई करण्यात येणार आहे व प्रदूषित नद्यांचे पाणी शुध्द करणे तसेच घनकचरा व्यवस्थापनाच्या नियमांचे पालन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या एप्रिल, २०१७ ते मार्च, २०१८ च्या अहवालानुसार भातसा नदीची जल गुणवत्ता निर्देशांक श्रेणी “चांगले ते उत्तम” या वर्गवारीमध्ये आढळून आली आहे.
(४) नागरी घनकचरा व्यवस्थापन नियम, २०१६ च्या अनुषंगाने मा. राष्ट्रीय हरित लवाद, दिल्ली यांच्याकडे दाखल मुळ अर्ज क्र. ६०६/२०१८ मध्ये मा. लवादाने दिनांक ०८/०४/२०१९ रोजी दिलेल्या आदेशानूसार मा. मुख्य सचिव यांनी दर तीन महिन्यांनी अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. याबाबतचा प्रथम अहवाल दिनांक १० जुलै, २०१९ रोजी सादर करण्याबाबत सुचित करण्यात आले आहे.
(५) हे खरे आहे.

(६) अ) देशातील नद्यांच्या प्रदूषित पट्ट्यांबाबत मा. राष्ट्रीय हरित लवाद, दिल्ली यांच्याकडे दाखल मूळ अर्ज क्र. ६७३/२०१८ मध्ये मा. लवादाने संपूर्ण देशातील नद्यांमधील प्रदूषित पट्ट्यांचे वर्गीकरण १ ते ५ प्रकारांमध्ये केले असून त्यामध्ये राज्यातील गोदावरी, कालू, कुंडलीका, मिठी, मोरना, मुळा, मुठा, निरा, वेल, भीमा, इंद्रायणी, मुळा-मुठा, पवना, वैनगंगा, वर्धा, घोड, कन्हन, कोलार, कृष्णा, मोर, पाताळगंगा, पेढी, पेनगंगा, पुर्णा, तापी, उरमोडी, वेन्ना, वाघुर, वेना, बिंदुसरा, बोरी, चंद्रभागा, दारणा, गिरना, हिवारा, कोयना, पेल्हार, सिना, तितुर, अंबा, भातसा, गोमई, कान, मांजरा, पंचगंगा, पांझरा, रंगावली, सावित्री, सुर्या, तानसा, उल्हास, वैतरना, वशिष्ठी या नद्यांमधील ५३ प्रदूषित पट्ट्यांचा समावेश करण्यात आला आहे.

आ) शहरी / ग्रामीण भागातून निर्माण होणारे घरगुती सांडपाणी तसेच औद्योगिक कारखान्यांमधून निर्माण होणारे औद्योगिक सांडपाणी विनाप्रक्रिया नदीमध्ये सोडणे इ. कारणांमुळे नदीचे प्रदूषण होते.

इ) • मा. हरित लवाद दिल्ली यांनी दिलेल्या निर्देशानुसार राज्यातील ५३ प्रदूषित नदयांच्या पट्टयांमधील प्रदूषण कमी करण्याकरिता कृती आराखडा तयार करणे, त्याची अमंलबजावणी करण्याकरिता दिनांक १३/१२/२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये नदी पुनरुत्थान समिती स्थापन करण्यात आली आहे. तसेच प्रदूषित नदी पट्यांमधील प्रदूषण रोखण्याकरिता प्रदूषित पट्टे असणाऱ्या जिल्ह्यांमध्ये स्वतंत्र पर्यावरण सनियंत्रण दलाची स्थापना करण्याचे निर्देशदेखील सदर शासन निर्णयान्वये देण्यात आले आहेत.

• महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत जलसंपदा विभागास नदीमध्ये किमान वाहता प्रवाह राखणे, चांगल्या जलसिंचन पध्दतीचा वापर करणे, नदीच्या दोन्ही बाजुंना झाडांची लागवड करणे, इ. उपाययोजना करण्याबाबत कळविले आहे.

• नगर विकास मंडळामार्फत सांडपाणी प्रक्रिया केंद्र स्थापन करण्यासाठी व घनकचरा व्यवस्थापन व विल्हेवाट करण्यासाठी कालबध्द कार्यक्रम राबविण्यात यावा असे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने नगर विकास मंडळास कळविले आहे.

• महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत कारखान्यांचे प्रदूषण निहाय वर्गीकरण करण्यात आले असून कारखान्यांना ऑनलाईन मॉनिटरींग सिस्टीम

लावणे बंधनकारक करण्यात आलेले आहे. तसेच मंडळामार्फत कोणत्याही कारखान्याला नदीमध्ये सांडपाणी सोडण्यास परवानगी देण्यात येत नाही.
(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील अभियांत्रिकी महाविद्‌यालयामधील नियमानुसार वेतन न देणाऱ्या संस्थाचालकांवर कारवाई करण्याबाबत

**(६६) * १३४८८७ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील अभियांत्रिकी महाविद्‌यालयामधील घटणाऱ्या विद्‌यार्थी संख्येचे कारण पुढे करत नियमानुसार वेतन देण्याचे संस्थाचालकांनी नाकारले असून नियमानुसार वेतन न मिळणाऱ्या कंत्राटी प्राध्यापकांना येणारा अनुभव पूर्णवेळ नियमित प्राध्यापकांनाही येत असून सहायक प्राध्यापक पदासाठी निवड करताना नियमानुसार पूर्ण वेतन न मागण्याचे किंवा त्याबाबत कुठेही तक्रार न करण्याचे प्रतिज्ञापत्र घेण्यात येत असल्याचे माहे मार्च, २०१९ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाच्या अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या नियमानुसार नियमित प्राध्यापकांना वेतन देणे बंधनकारक असताना संस्थांकडून वेतन बुडविले जात असल्यामुळे संस्थांच्या विरोधात सातत्याने आंदोलने होत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे व त्यानुसार नियमानुसार वेतन न देणाऱ्या संस्थाचालकांवर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) नाही.

(२) होय, खालील संस्थांमध्ये आंदोलने झालेली आहेत -

१) सरस्वती एज्युकेशन सोसायटी, कर्जत, रायगड संचलित सर्व महाविद्यालये.

२) महात्मा गांधी मिशनचे, कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, हिंगोली रोड, नांदेड

३) भगवान कॉलेज ऑफ फार्मसी, औरंगाबाद

४) सिंहगड टेक्नीकल एज्युकेशन सोसायटी, पुणे

(३) तंत्र शिक्षण संचालनालयाकडे प्राप्त तक्रारींची तंत्र शिक्षण विभागीय कार्यालयाच्या स्तरावर चौकशी करण्यात आलेली आहे. या चार संस्थांपैकी, एका संस्थेतील शिक्षक व कर्मचाऱ्यांना वेतन देण्याबाबत मा.सर्वोच्च न्यायालयाने आदेश दिले आहेत, तर एक संस्था टप्प्याटप्प्याने बंद करण्याचा निर्णय झालेला आहे.

उर्वरित दोन संस्थांचा चौकशी अहवाल तंत्र शिक्षण संचालनालयाकडून अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली तसेच संबंधित प्राधिकरणाकडे पुढील कार्यवाहीकरीता पाठविण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## खालापूर (जि.रायगड) तालुक्यातील औद्योगिक वसाहतीतील रासायनिक सांडपाणी तसेच जलपर्णीमुळे पाताळगंगा नदी प्रदुषित झाल्याबाबत

**(६७) * १३५०५८ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.नसीम खान (चांदिवली), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.भारत भालके**

**(पंढरपूर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खालापूर (जि.रायगड) तालुक्यातील औद्योगिक वसाहतीतील रासायनिक कारखान्यांमार्फत सतत सोडण्यात येणाऱ्या रासायनिक सांडपाण्यामुळे व जलपर्णीमुळे पाताळगंगा नदी प्रदुषित झाली असल्याचे माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नदीतील प्रदुषित पाण्यामुळे मासेमारी करणारे कोळी बांधव तसेच शेती करणा-या शेतक-यांच्या उदरनिर्वाहाचे साधन नष्ट होऊन त्यांच्या कुटूंबियांवर उपासमारीची वेळ आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नदीत रासायनिक पाणी सोडणा-या कारखान्यांवर कारवाई तसेच मोठया प्रमाणात वाढत असणारी जलपर्णी काढण्याकडे दुर्लक्ष करणा-या संबंधित विभागामुळेच नदीच्या प्रदुषणात वाढ होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार नदीत सांडपाणी सोडणाऱ्या कंपन्या व जलपर्णी काढण्याच्या कामात दुर्लक्ष करणा-या संबंधित विभागाच्या अधिका-यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) हे खरे नाही.

(२) याबाबतची तक्रार सहाय्यक आयुक्त, मत्सव्यवसाय, रायगड- अलिबाग तसेच तालुका कृषी अधिकारी, खालापूर यांच्याकडे प्राप्त झालेली नाही.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## शिक्षण हक्क कायद्याअंतर्गत (RTE) आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांच्या २५ टक्के राखीव जागांच्या प्रवेश प्रक्रियेबाबत

**(६८) * १३५०७५ श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.छगन भुजबळ (येवला),**

**श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्री.संजय कदम (दापोली), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.दिलीप सोपल (बार्शी), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.प्रदीप नाईक (किनवट), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिक्षण हक्क कायद्याअंतर्गत (RTE) आर्थिकदृष्ट्या दूर्बल घटकांतील विद्यार्थ्यांच्या २५ टक्के राखीव जागांच्या प्रवेश प्रक्रियेत अर्ज करण्याची मुदत दिनांक २२ मार्च, २०१९ रोजी वा त्यासुमारास संपली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेसाठी राज्यात किती जागा राखीव ठेवण्यात आलेल्या आहेत व RTE योजनेअंतर्गत राज्यातून किती अर्ज प्राप्त झालेले आहेत,

(३) असल्यास, राखीव असलेल्या जागेपेक्षा जास्त अर्ज प्राप्त झाले असल्यास उर्वरीत विद्यार्थ्यांच्या प्रवेशाची व्यवस्था कोणत्या प्रकारे करण्यात येणार आहे व याबाबतची सद्यस्थिती काय आहे ?

**ॲड. आशिष शेलार :** (१) हे खरे नाही.

(२) या योजनेसाठी राज्यात एकूण १,१६,७७९ जागा राखीव ठेवण्यात आलेल्या असून, २,४४,९३४ अर्ज प्राप्त झाले आहेत.

(३) आरटीई मध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांव्यतिरिक्त उर्वरीत विद्यार्थी अन्य शाळेत प्रवेश घेतात.

-----------------

## राज्यातील जिल्हा परिषद शाळांमध्ये २० पेक्षा कमी पटसंख्या असलेल्या शाळा बंद करण्यात येत असल्याबाबत

**(६९) * १३८२६४ श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील जिल्हा परिषदेच्या शाळांना पट संख्येनुसार अनुदान देण्याचा निर्णय शासनाने दिनांक ३१ जानेवारी, २०१९ रोजी त्यासुमारास घेतला असून १०० पेक्षा कमी पट संख्येच्या शाळांना देखील १० हजार रुपये अनुदान देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, हे खरे आहे काय

(२) तसेच, राज्यातील जिल्हा परिषदेअंतर्गत असलेल्या शाळांमध्ये २० पेक्षा कमी पटसंख्या असलेल्या शाळांची माहिती शासनाकडून मागविण्यात येत असून या शाळा बंद करण्यात येणार असल्याचे दिनांक १ मे, २०१९ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास उक्त शाळा बंद केल्यास ग्रामिण भागातील गरीब/गरजु विद्यार्थ्यांना शिक्षणाची पर्यायी सुविधा मिळणार नाही अशी भिती व्यक्त होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार शाळा बंद न करण्याबाबत तसेच शाळांचा वीजपुरवठा सुरळीतपणे चालू राहावा यासाठी अनुदान देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आशिष शेलार :** (१) अंशत: खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## भुसावळ (जि.जळगाव) येथील राज्य दक्षता समितीमार्फत शहरातील व तालुक्यातील स्वस्त धान्य दुकानांची केलेली तपासणी

**(७०) * १४०३३८ श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भुसावळ (जि.जळगाव) व तालुक्यातील इतर स्वस्त धान्य दुकानांची राज्यस्तरीय दक्षता पथक प्रमुख, मुंबई यांनी तपासणी केली असून समितीने दिनांक २५ एप्रिल, २०१९ रोजी सादर केलेला अहवाल जिल्हा पुरवठा कार्यालयास दिनांक १५ मे, २०१९ रोजी प्राप्त झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कु-र्हे पानाचे येथील ग्रामस्थांनी आवश्यक कागदपत्रे सादर करुनही रेशन दुकानदार धान्य देत नसून सदर दुकानदार कार्डधारकाकडून प्रत्येकी रु.१०० घेत आहेत तसेच भुसावळ तालुक्यातील सुमारे सहाशे कार्डधारकांची नांवे नाशिक जिल्हयात जोडली गेली असल्याचे निदर्शनास आल्याने ग्रामस्थांनी दिनांक ३० मे, २०१९ रोजी वा त्यासुमारास भुसावळ तहसिल कार्यालयावर मोर्चा काढला होता, हे ही खरे आहे काय.

(३) असल्यास, दक्षता समितीच्या पथकास भुसावळ शहर व भुसावळ तालुक्यातील एकूण ३१ दुकानांमध्ये दोष/ त्रुटी आढळून आल्याने ३१ स्वस्त धान्य दुकानदारांना दिनांक १७ मे, २०१९ रोजी नोटीस काढून दिनांक २७ मे, २०१९ रोजी त्यांचे म्हणणे मांडण्याची त्यांना संधी देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी माहे जानेवारी, २०१९ मध्ये तत्कालीन जिल्हाधिकारी, जळगाव यांनी श्री.सुरेश बंडू सनांसे, श्री.सी एम कोठारी, श्रीमती छाया गुरव, श्री.साळवे, श्री.ए.ए.खान या स्वस्त धान्य दुकानदारांच्या चौकशीचे आदेश देऊनही तहसीलदार, भुसावळ व पुरवठा तपासणी अधिकारी यांनी कोणतीच कारवाई केली नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार यात दोषी आढळून आलेल्या दुकानदारांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येणार आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर :** (१) होय.

(२) दुकानदार कार्ड धारकाकडून रु.१००/- घेत आहे अशी बाब नाही. मात्र, दि.३० मे,२०१९ रोजी ग्रामस्थांनी तहसिल कार्यालयावर मोर्चा काढला होता.

(३) दि.२७ मे, २०१९ रोजी दोषी आढळलेल्या ३१ स्वस्त धान्य दुकानदारांना त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी देण्यात आली आहे.

(४) श्री.एस.बी.सनांन्से व इतर यांनी जिल्हा पुरवठा अधिकारी यांच्या दि.१०/०१/२०१८ च्या आदेशाविरुध्द औरंगाबाद खंडपीठाकडे दोन रिट याचिका दाखल केल्या होत्या. या याचिकांवर मा.उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठ यांनी दि.२१/०८/२०१८ रोजी दिलेल्या आदेशानुसार कार्यवाही करण्याच्या जिल्हाधिकारी, जळगांव यांनी जानेवारी, २०१९ मध्ये सूचना दिलेल्या होत्या. त्या अनुषंगाने ५ दुकानदारांचे प्राधिकारपत्र रद्द करण्यात आलेले आहेत.

(५) दक्षता समितीच्या अहवालानुसार ३१ दुकानदारांना नोटीसा बजावण्यात आलेल्या आहेत व त्यांना सुनावणीची संधी देण्यात आलेली आहे.

(६) अशी बाब नाही.

-----------------

## कोलगेट आणि सेन्सॉडाईन या टूथपेस्ट ब्रँडनी वैद्यकीय दावा करून लोकांची दिशाभूल केल्याबाबत

**(७१) * १३५८८२ श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सौंदर्य प्रसाधनाच्या लेबलवर ग्राहकांची दिशाभूल करणारा वैद्यकिय दावा उत्पादन कंपन्यांनी नमूद करणे कायद्याने गुन्हा असताना मे.ग्लॅक्सो स्मिथलाइन कन्झ्युमर हेल्थ लि.कंपनीच्या सेन्सोडाइन आणि मे.कोलगेट पॉमोलिव्ह इंडिया लि.च्या कोलगेट उत्पादनांवर दिशाभूल करणारा दावा छापण्यात आल्याने एफडीएने कारवाई करून सुमारे ४ कोटी ६९ लाख ३० हजार ७६८ रुपयांचा साठा जप्त केल्याचे माहे, एप्रिल २०१९ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कारवाईनुसार संबंधीत कंपन्यांची चौकशी करण्यात आली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार सदर कंपन्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) सदर प्रकरणी दोन्ही कंपन्यांना अन्न व औषध प्रशासनाने कारणे दाखवा नोटीस बजावली असून त्याअनुषंगाने मे. glaxosmithkline consumer Healthcare Ltd. भिवंडी यासंस्थेने मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे रीट पिटीशन क्र.४८४१/२०१९ दाखल केले आहे.

सदर प्रकरणी मा.न्यायालयाने जप्त केलेला साठा प्रमाणित दर्जाचा असल्याने त्या साठ्यातून Sensodyne Toothpaste या पाठाचे ७ Variants चे नमूने जतन करुन उर्वरीत साठा मुक्त करण्याचे आदेश दिले आहेत. तसेच याचिकाकर्त्यास प्रशासनाकडे सादरीकरण करण्याबाबत मा.उच्च न्यायालयाने निर्देश दिले असून सदर प्रकरण मा.उच्च न्यायालयात अंतिम आदेशासाठी न्यायप्रविष्ठ आहे.

मे.कोलगेट पोलिमोलिव्ह (इंडिया) प्रा.लि. या संस्थेने मा.न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, भिवंडी यांचे न्यायालयात जप्त केलेला “कोलगेट ॲण्टी कॅव्हीटी टुथपेस्ट, सेन्सीटीव्ह, २४/७ सेन्सीटीव्ह प्रोटेक्शन/क्लिनिकली प्रोव्हेन रिलिफ” चा साठा मुक्त करण्याबाबत दि.२१.०५.२०१९ रोजी अर्ज केला असून सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई शहरातील अनधिकृत शाळांवर कारवाई करण्याबाबत

**(७२) * १३४९०३ ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.नरेंद्र महेता (मिरा भाईंदर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.मंगलप्रभात लोढा**

**(मलबार हिल), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.बसवराज पाटील (औसा), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरातील २११ अनधिकृत शाळांवर कायदेशीर कारवाई करण्याचा निर्णय माहे मार्च, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान मुंबई महानगरपालिकेने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिक्षण संस्था चालविण्यासाठी आवश्यक परवानग्या न घेताच संस्थाचालक शाळा सुरु करत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने याबाबत चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले त्यानुसार किती अनधिकृत शाळांवर कारवाई केली वा करण्यात येत आहे, व त्यांचे स्वरूप काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आशिष शेलार :** (१) अंशत: खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई विद्‌यापीठाने नियमबाह्यरित्या नियुक्त केलेल्या प्राचार्यांबाबत

**(७३) * १३८५४२ श्री.राज पुरोहित (कुलाबा), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) मुंबई विद्यापीठाने निकषात बसत नसतानाही नियुक्त केलेल्या प्राचार्यांनी ३० वर्षांहून अधिक काळ सेवा बजावल्याची माहिती माहे मे, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या सदंर्भात चौकशी समितीने सादर केलेल्या अहवालानंतर नियुक्ती रद्द करण्यात आली असून प्राचार्यांना एवढ्या वर्षांचे वेतन व अन्य लाभांसाठीची मिळालेली दीड कोटीहून अधिकची रक्कम परत करावी लागणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय त्यात काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्‌भवत नही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील हजारो शाळा वेतनेत्तर अनुदानापासून वंचित असल्याबाबत

**(७४) * १३४८९२ श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शालेय शिक्षण विभागांतर्गत १ एप्रिल, २००८ नंतर अनुदानावर असलेल्या राज्यातील अनेक शाळा वेतनेत्तर अनुदानापासून वंचित असून सातत्याने पाठपुरावा करुनही अद्याप अनुदान मंजूर न केल्याने, अनुदान मंजूर करुन शिक्षकांना न्याय द्यावा अशी मागणी विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाचे अध्यक्षांनी मा.मुख्यमंत्री, मा.शालेय शिक्षण मंत्री तसेच अप्पर मुख्य सचिव यांचेकडे दिनांक ४ एप्रिल, २०१९ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निवेदनातील मागण्यांचे थोडक्यात स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, उक्त मागण्यांच्या संदर्भात शासनाने कोणता निर्णय घेतला आहे, अद्याप निर्णय घेतला नसल्यास होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत,

**ॲड. आशिष शेलार :** (१) व (२) सदर निवेदन प्राप्त झालेले नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.